# विकसित भारताचे लक्ष्य

रायगड, नवी मुंबई
राम प्रहर
◆ वर्ष १७ ◆ अंक ७
www.ramprahar.com
बुधवार, २४ जुलै २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

नवी दिल्ली : वृत्तसंस्था

**केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी मंगळवारी (दि. २३) पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील एनडीए सरकारच्या तिसऱ्या टर्मचा पहिला अर्थसंकल्प सादर केला. विकसित भारतासाठी नऊसूत्री कार्यक्रमाद्वारे रोडमॅप तयार करणे हे या अर्थसंकल्पाचे उद्दिष्ट आहे. यामध्ये सुधारणावादी धोरणांवर भर देण्यात आला आहे.**



### काय स्वस्त?

*सोने, चांदी, कृत्रिम हिरे, मोबाईल हॅण्डसेट, चार्जर, सुटे भाग, कॅन्सरवरील औषधे, पोलाद-तांबे, लिथियम बॅटरी, इलेक्ट्रीक वाहने, सोलार सेट, चामड्यापासून बनणाऱ्या वस्तू, पीव्हीसी फ्लेक्स बॅनर, विजेची तार*



### काय महाग?

*प्लास्टिक उत्पादने, विमान प्रवास, सिगारेट, टेलिकॉम उपकरणे, पीव्हीसी पाईप*

## केंद्रीय अर्थसंकल्पात नऊसूत्री कार्यक्रमावर भर

### कृषी क्षेत्रासाठी १.५२ लाख कोटींची तरतूद

अर्थसंकल्पात कृषी व संलग्न क्षेत्रांसाठी १.५२ लाख कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. शेती क्षेत्रातील उत्पादकता वाढावी यासाठी डिजिटल पब्लिक इन्फ्रास्ट्रक्चर पुरवले जाणार आहे. यातून शेतीपिकांचे सर्वेक्षण, मातीची तपासणी अशा सर्व गोष्टींची माहिती शेतकऱ्यांना दिली जाईल तसेच नैसर्गिक शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी आवश्यक ती पावले उचलली जाणार आहेत. पुढील काही वर्षात एक कोटी शेतकऱ्यांना नैसर्गिक शेती करण्यास प्रोत्साहन दिले जाणार आहे.

### महिलांसाठी विविध घोषणा

विविध कार्यक्षेत्रांमध्ये महिलांचा सहभाग वाढविण्यासाठी नोकरदार महिलावर्गासाठी वसतिगृहाची स्थापना करण्यात येणार आहे. सर्वांगीण विकासासाठी राष्ट्रीय समन्वय धोरण राबवले जाईल. याशिवाय देशांतर्गत संस्थांमध्ये उच्च शिक्षणासाठी १० लाख रुपयांची आर्थिक मदत केली जाईल. त्याचप्रमाणे सरकार महिलांच्या निवासी मालमत्तांच्या खरेदीवर शुल्क कमी करण्याचा आणि शहरी विकास योजनांचा एक अनिवार्य घटक करण्याचा विचार करणार आहे. सरकार महिलांनी खरेदी केलेल्या संपत्तीचे शुल्क कमी करणाऱ्या राज्यांना प्रोत्साहन देईल.



### समाजातील प्रत्येक घटकाला मिळणार बळ -पंतप्रधान मोदी



समाजातील प्रत्येक घटकाला बळ देणारा, तरुणांना नवीन संधी उपलब्ध करून देणारा हा अर्थसंकल्प आहे. या अर्थसंकल्पामुळे शिक्षण आणि कौशल्ये नवीन उंची गाठतील. छोटे व्यापारी, एमएसएमईंना प्रगतीचा नवा मार्ग मिळेल. महिलांचा आर्थिक सहभाग सुनिश्चित होण्यास मदत होईल, अशी प्रतिक्रिया पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिली आहे. भारताला जगातील तिसरी सर्वात मोठी आर्थिक शक्ती बनविण्याच्या प्रक्रियेत हा अर्थसंकल्प मुख्य स्रोत म्हणून काम करेल आणि विकसित भारताचा भक्कम पाया घालेल, असेही ते म्हणाले.

### तरुणांसाठी इंटर्नशीप; पाच हजार रुपये भत्ता



सरकार पाच वर्षांत एक कोटी तरुणांना ५०० कंपन्यांमध्ये इंटर्नशिपच्या संधी देणार आहे तसेच याचे मानधन म्हणून पाच हजार रुपये भत्ता दिला जाणार आहे. यासोबतच इंटर्नशिप पूर्ण करणाऱ्या तरुणांना सहा हजार रुपयांची वेगळी रक्कमही दिली जाणार आहे. त्याचप्रमाणे पाच वर्षांच्या कालावधीत २० लाख तरुणांना कुशल केले जाईल. एकूण १००० औद्योगिक प्रशिक्षण संस्था अपग्रेड केल्या जातील. याशिवाय पुढील पाच वर्षांसाठी ४.१ कोटी तरुणांना रोजगार देण्यात येणार आहे.

**“ विकसित भारतासाठी आमची पहिली प्राथमिकता कृषी क्षेत्रातील उत्पादकता आहे. दुसरे प्राधान्य म्हणजे रोजगार आणि कौशल्य. तिसरे प्राधान्य सर्वसमावेशक मानव संसाधन विकास आणि सामाजिक न्याय आहे. चौथे प्राधान्य उत्पादन आणि सेवा आहे. पाचवे शहरी विकासाला चालना देणे हे आहे. सहावे प्राधान्य ऊर्जा सुरक्षा आहे. सातवे म्हणजे पायाभूत सुविधा, त्यानंतर आठवे नवकल्पना, संशोधन आणि विकास असून नववे प्राधान्य पुढच्या पिढीतील सुधारणा आहे. या प्राधान्यांच्या आधारे आगामी अर्थसंकल्प तयार करण्यात आला आहे.**

**–निर्मला सीतारामन**, केंद्रीय अर्थमंत्री



### मुद्रा लोन कर्ज मर्यादा दुप्पट

पंतप्रधान मुद्रा योजनेसंदर्भात मोठी घोषणा अर्थसंकल्पात करण्यात आली आहे. या सरकारी योजनेत मुद्रा कर्जाची मर्यादा दुप्पट करण्यात आली आहे. यापूर्वी यात एमएसएमईंना १० लाख रुपयांपर्यंतचे कर्ज दिले जात होते. ते आता २० लाख रुपये करण्यात आले आहे.

### गरीब कल्याण अन्न योजनेला मुदतवाढ

अर्थसंकल्पात प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजनेला पाच वर्षांची मुदतवाढ देण्यात आली आहे. कोरोना काळात केंद्र सरकारने देशातील जवळपास ८० कोटी गरीब लोकांना मोफत रेशन देण्यासाठी प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजना सुरू केली होती.



### अशी असेल नवी करप्रणाली (वार्षिक उत्पन्नानुसार)

| वार्षिक उत्पन्न | प्राप्तिकर |
| --- | --- |
| ०-३ लाख | कुठलाही कर नाही |
| ३-७ लाख | ५ टक्के |
| ७-१० लाख | १० टक्के |
| १०-१२ लाख | १५ टक्के |
| १२-१५ लाख | २० टक्के |
| १५ लाखांपुढे | ३० टक्के |

- *नव्या कर प्रणालीत स्टॅण्डर्ड डिडक्शन हे ५० हजारांवरून ७५ हजार करण्यात आले आहे.*
- *पेन्शनची मर्यादाही १५ हजारांवरून २५ हजारांपर्यंत वाढवण्यात आली आहे.*



### महाराष्ट्रासाठी ठळक तरतुदी

- **विदर्भ, मराठवाड्यातील सिंचन प्रकल्प : ६०० कोटी**
- **महाराष्ट्र ग्रामीण रस्ते सुधार : ४०० कोटी**
- **सर्वसमावेशक विकासासाठी इकॉनॉमिक कॉरिडॉर : ४६६ कोटी**
- **पर्यावरणपूरक शाश्वत कृषी प्रकल्प : ५९८ कोटी**
- **महाराष्ट्र कृषी आणि ग्रामीण परिवर्तन प्रकल्प : १५० कोटी**
- **एमयुटीपी-३ : ९०८ कोटी**
- **मुंबई मेट्रो : १०८७ कोटी**
- **दिल्ली-मुंबई औद्योगिक कॉरिडॉर : ४९९ कोटी**
- **एमएमआर ग्रीन अर्बन मोबिलिटी : १५० कोटी**
- **नागपूर मेट्रो : ६८३ कोटी**
- **नाग नदी पुनरुज्जीवन : ५०० कोटी**
- **पुणे मेट्रो : ८१४ कोटी**
- **मुळा मुठा नदी संवर्धन : ६९० कोटी**



“ गरीब, महिला, युवा, शेतकरी या घटकांवर भर देतानाच कृषी व संलग्न क्षेत्रांसाठी १.५२ लाख कोटींची तरतूद तसेच शेती क्षेत्रातील उत्पादकता वाढवण्यासाठी डिजिटल पब्लिक इन्फ्रास्ट्रक्चर पुरविण्याचा अर्थसंकल्पात घेण्यात आलेला निर्णय कृषी क्षेत्राबरोबरच शेतकऱ्यांना बळ देणारा आहे. हा अर्थसंकल्प शेतकरी, महिला, युवा, कौशल्य विकास, रोजगार, पायाभूत सुविधांची उभारणी, शहरांचा विकास अशा विविध नऊ घटकांवर लक्ष केंद्रित करणारा नवरत्न अर्थसंकल्प आहे.

**–एकनाथ शिंदे**, मुख्यमंत्री



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात तिसऱ्या टर्मचा पहिला अर्थसंकल्प देशातील युवा, गरीब आणि शेतकऱ्यांना डोळ्यासमोर ठेवून बनवण्यात आलेला संतुलित अर्थसंकल्प आहे. मध्यमवर्गाला फायदा देत भविष्याचा वेध घेणारा हा अर्थसंकल्प आहे. अर्थसंकल्पात महाराष्ट्राला अनेक गोष्टी मिळाल्या आहेत, मात्र विरोधकांकडून फेक नरेटिव्ह तयार करण्याचा प्रयत्न होतोय. माझा विरोधकांना सल्ला आहे की, फक्त नरेटिव्ह सेट करण्यासाठी राजकारण करू नका.

**–देवेंद्र फडणवीस**, उपमुख्यमंत्री



प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सलग तिसऱ्या एनडीए सरकारचा पहिलाच अर्थसंकल्प महाराष्ट्र आणि देशवासीयांची मने जिंकणारा अर्थसंकल्प ठरला आहे. मध्यमवर्गीय आणि नोकरदारवर्गाच्या आशा-आकांक्षा-अपेक्षांची पूर्तता करणारा; शेती, उद्योग, व्यापार, शिक्षण, आरोग्य, सहकार, रोजगार, स्वयंरोजगार, विज्ञान, संशोधन, कौशल्यविकास, सामाजिक न्याय, महिला सक्षमीकरण अशा सर्व क्षेत्रांच्या विकासाला बळ देणारा, मजबूत-विकसित भारताची पायाभरणी करणारा, देशाला विश्वशक्ती बनवण्याच्या वाटेवर नेणारा हा अर्थसंकल्प आहे.

**–अजित पवार**, उपमुख्यमंत्री

## निवडक

### नीट-यूजी फेरपरीक्षा होणार नाही; सुप्रीम कोर्टाचा निर्णय

**नवी दिल्ली** : नीट-यूजी पेपरफुटी प्रकरणानंतर ही परीक्षा पुन्हा घेण्यात यावी, अशी याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आली होती. या याचिकेवर सुनावणी घेत असताना फेरपरीक्षा घेण्याची मागणी फेटाळून लावत पेपरफुटी प्रकरण हे पूर्वनियोजित असल्याचा एकही पुरावा मिळाला नसल्याचेही न्यायालयाने सांगितले. सरन्यायाधीश चंद्रचूड यांच्या नेतृत्वाखालील तीन न्यायाधीशांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला.

### मुंबई क्रिकेट असोसिएशनच्या अध्यक्षपदी अजिंक्य नाईक

**मुंबई** : येथील मुंबई क्रिकेट असोसिएशनच्या निवडणुकीत अजिंक्य नाईक विजयी झाले आहेत. दिवंगत अध्यक्ष अमोल काळे यांच्या निधनानंतर झालेल्या निवडणुकीत उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी काँग्रेस नेते भूषण पाटील यांनी आपला अर्ज मागे घेतल्याने सचिव अजिंक्य नाईक आणि उपाध्यक्ष संजय नाईक यांच्यात थेट लढत झाली. यात अजिंक्य नाईक विजयी झाले.

## सीकेटी महाविद्यालयात ४ ऑगस्टला मोफत आरोग्य तपासणी आणि औषधोपचार महाशिबिर



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

अखंडपणे समाजोपयोगी उपक्रम राबविणारे श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पनवेल, भारतीय जनता पक्ष, रायगड जिल्हा मेडिकल असोसिएशन आणि साधू वासवानी मिशन पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (दि. ४ ऑगस्ट) विनामूल्य आरोग्य तपासणी आणि मोफत औषधोपचार महाशिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली दरवर्षी या महाशिबिराचे आयोजन करण्यात येते. त्या अनुषंगाने यंदा हे १६वे महाशिबिर आहे.

पनवेलमधील खांदा कॉलनी येथील सीकेटी महाविद्यालयाच्या प्रांगणात होणाऱ्या या महाशिबिरात सर्वसाधारण रोग तपासणी, बालरोग तपासणी, महिलांचे आजार, त्वचारोग तपासणी, हृदयरोग तपासणी, दंतरोग तपासणी, मधुमेह तपासणी, नाक, नाक व घसा तपासणी, हाडांचे रोग तपासणी, कर्करोग तपासणी, क्षयरोग तपासणी, होमिओपॅथिक तपासणी, आयुर्वेदिक तपासणी, सर्व प्रकारच्या रक्त तपासणी तसेच नेत्र तपासणी व चष्मेवाटप, कृत्रिम हात व पाय बसविणे अशा विविध आरोग्य तपासण्यांसह तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला व औषधोपचार देण्यात येणार आहे. त्याचबरोबर आयुष्यमान भारत डिजिटल कार्ड तयार करून देण्यात येणार असून महात्मा फुले योजनेंतर्गत आधारकार्डला लिंक करून देण्याचीही सुविधा या ठिकाणी असणार आहे. या वेळी दिव्यांगांना प्रमाणपत्र वाटप करण्यात येणार असून अवयदानाचे फॉर्म भरण्याची सुविधा उपलब्ध असणार आहे.

या महाशिबिराचा दरवर्षी १५ हजारहून अधिक नागरिक लाभ घेत असतात. प्रत्येक शिबिरार्थीला योग्य सेवा मिळाली पाहिजे या अनुषंगाने नियोजनात कोणतीही कसर राहू नये यासाठी विविध समित्या गठीत करण्यात आल्या असून महाशिबिरासंदर्भात अधिक माहितीसाठी डॉ. अरुणकुमार भगत (९२२३५०५५५५) किंवा अनिल कोळी (९७६९४०९१६१) यांच्याशी संपर्क करावा, असे आवाहन आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांनी केले आहे.

## काँग्रेसचे कार्यकर्ते नाराज होतील अशी वक्तव्ये शेकापच्या जयंत पाटलांनी करू नयेत -श्रीरंग बर्गे



**अलिबाग : प्रतिनिधी**

तुम्ही महाविकास आघाडीचे नेते आहात. आम्हाला सूचना जरूर करा, मात्र काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांमध्ये अस्वस्थता निर्माण होईल, कार्यकर्ते नाराज होतील अशी वक्तव्ये करू नका, असे खडे बोल काँग्रेसचे रायगड जिल्हा प्रभारी श्रीरंग बर्गे यांनी शेकापचे सरचिटणीस जयंत पाटील यांना सुनावले आहेत.

रायगड जिल्हा काँग्रेस कमिटीची आढावा बैठक मंगळवारी (दि. २३) अलिबाग येथील बॅ.ए.आर. अंतुले काँग्रेस भवनात आयोजित करण्यात आली होती. त्यापूवी झालेल्या पत्रकार परिषदेत बर्गे बोलत होते. काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत, चंद्रकांत पाटील, नंदा म्हात्रे, प्रदेश सेक्रेटरी अ‍ॅड. प्रवीण ठाकूर या वेळी उपस्थित होते.

लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीचे उमेदवार अनंत गीते यांना जी मते मिळाली आहेत ती शेकापचीच आहेत, असे वक्तव्य शेकापचे सरचिटणीस जयंत पाटील यांनी केले होते. त्यामुळे काँग्रेस कार्यकर्ते नाराज झाले आहेत. याबाबत प्रश्न विचारला असता काँग्रेसचे रायगड जिल्हा प्रभारी श्रीरंग बर्गे यांनीदेखील उघड नाराजी व्यक्त केली.

जागावाटप करताना विजयी होण्याची क्षमता ज्या पक्षाकडे आहे त्या पक्षाचा उमेदवार देण्याचा निर्णय जागावाटप करताना घेतला जाईल. अलिबाग, पेण, उरण, श्रीवर्धन येथे काँग्रेसची ताकद आहे. त्यामुळे या जागा मिळाव्यात यासाठी आम्ही आग्रही राहू, मात्र जागावाटपाचा निर्णय हा वरिष्ठ स्तरावर घेतला जाईल, असे बर्गे यांनी सांगितले.

लोकसभा निवडणुकीत काँग्रेसने रायगड आणि मावळ या दोन्ही जागा शिवसेनेसाठी सोडल्या होत्या, मात्र विधानसभा निवडणुकीत जागावाटपात रायगडमध्ये काँग्रेसला झुकते माप मिळायला हवे, असेही बर्गे यांनी या वेळी म्हटले.

# आपला दवाखान्यांत २७ लाख रुग्णांवर उपचार

## आणखी ३३४ दवाखाने सुरू करण्याची कार्यवाही

**मुंबई : प्रतिनिधी**

शहरी व ग्रामीण भागातील सर्वसामान्य, गोरगरीबांना घराजवळ आरोग्य सेवा उपलब्ध व्हावी यासाठी राज्य सरकारने प्रत्येक जिल्ह्यांत हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना सुरू करण्याचा निर्णय घेतला होता. त्यानुसार राज्यात आतापर्यंत सुरू झालेल्या ३६६ आपला दवाखान्यांमध्ये २७ लाख ६६ हजार ७३७ रुग्णांनी मोफत उपचार घेतले, तसेच भविष्यात जिल्हास्तरावर आणखी ३३४ आपला दवाखाने कार्यान्वित करण्याबाबतची प्रक्रिया सुरू आहे.




मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या संकल्पनेतून मुंबई महानगरपालिकेने सुरू केलेल्या हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखान्याला मिळणारा चांगला प्रतिसाद लक्षात घेऊन राज्यातील अन्य जिल्ह्यांमध्ये ही योजना राबविण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला. त्यानुसार सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत शहरी व ग्रामीण भागातील सर्वसामान्य, गोरगरीब, झोपडपट्टीत राहणाऱ्या नागरिकांसाठी मुंबई व मुंबई उपनगर जिल्हे वगळता राज्यातील ३४ जिल्ह्यांमध्ये ७०० हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना उभारण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत १ मे २०२३पासून आतापर्यंत एकूण ३६६ आपला दवाखाना कार्यान्वित करण्यात आले.

राज्यातील हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखान्यांमध्ये १ मे २०२३ ते २० जुलै २०२४ या काळात एकूण २७ लाख ६६ हजार ७३७ रुग्णांवर उपचार करण्यात आले. यापैकी तीन लाख ३९ हजार ४२५ रुग्णांची मोफत प्रयोगशाळा तपासणी करण्यात आली, तर ४७ हजार ५६४ गर्भवती मातांची आपला दवाखान्याच्या माध्यमातून तपासणी करण्यात आली. मंजूर आपला दवाखान्यांपैकी ३३४ दवाखाने जिल्हास्तरावर कार्यान्वित करण्याची प्रक्रिया सुरू आहे. हे दवाखाने सुरू झाल्यानंतर अधिकाधिक नागरिकांना याचा लाभ होईल, अशी माहिती आरोग्य सेवा संचालनालयाचे संचालक डॉ. नितीन अंबाडेकर यांनी दिली.

# ‘जेएनपीए’त वाहतूक कोंडी संपुष्टात

## अध्यक्ष उन्मेष वाघ यांची पत्रकार परिषदेत माहिती

**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

जेएनपीए बंदरातील कामकाज सुरळीत असून जून महिन्यात बंदरात सर्वाधिक कंटेनर हाताळणी करण्यात आली आहे, तर बंदरात कोणत्याही प्रकारची वाहतूक कोंडी नसल्याचा दावा जेएनपीए प्रशासन भवनात आयोजित पत्रकार परिषदेत जेएनपीएचे अध्यक्ष उन्मेष वाघ यांनी केली आहे. बंदरात ये-जा करण्यासाठी खड्डेमुक्त रस्ते तयार करण्यात आले आहेत. त्यामुळे बंदरातील रस्त्यावरील खड्ड्यांमुळे होणारी वाहतूक कोंडी संपुष्टात आली आहे.

अडचण असतानाही जहाजे परत न पाठविता ती बंदरात घेऊन हाताळणी करण्यात आली. त्यामुळे बंदरात कंटेनर वाहने थांबतील, अशी स्थिती नसल्याचा दावा अध्यक्षांनी



या वेळी केला, तर बंदराच्या वाहतुकीत सुधारणा करण्यासाठी वाहनतळ तयार करण्यात आले आहे. याशिवाय पुढील काळात रस्त्यावर व रस्त्याच्या कडेला उभी करण्यात येणारी वाहने यांच्यावर कारवाई सुरू करणार असल्याचे सांगितले.

बेलपाडामार्गे एक नवा मार्ग, शेतकऱ्यांच्या नाशवंत मालाची साठवणूक आणि प्रकिया करणारे केंद्र उभारण्यात येणार आहे. यामध्ये महाराष्ट्रासह गुजरात, गोवा, कर्नाटक व उत्तर भारतातील राज्यातील शेतकऱ्यांना लाभ होणार आहे. त्यासाठी ३०० कोटींच्या कामाची निविदा काढण्यात आल्याची माहिती उन्मेष वाघ यांनी दिली आहे. जेएनपीए परिसरात अवैध पार्किंग करणाऱ्यांवर जेएनपीएच्या माध्यमातून १५ ऑगस्टपर्यंत कडक कारवाईचे धोरण राबविण्यात येणार आहे. याशिवाय जे वाहन चालक जेएनपीएने नेमण्यात आलेल्या पार्किंगमध्ये वाहने न पार्क करता अवैध पार्किंग करतील त्यांचा परवानाच रद्द करण्यात येणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले आहे.

# भरावामुळे अलिबाग पळी येथील शेतीचे नुकसान

**अलिबाग : प्रतिनिधी**

तालुक्यातील पळी, आंबेधर येथील शेतीजमिनीत काही धनदाडग्यांनी शेती विकत घेऊन त्यामध्ये मातीचा भराव केला आहे. या भरावामुळे पावसाचे पाणी अडले गेले. पाण्याचा निचरा होत नसल्यामुळे पावसाचे पाणी शेतात तुंबून शेती नापीक झाली आहे.

भराव केलेल्या जागेच्या खालच्या भागात शेतात जाण्याचा वहिवाटीचा मार्ग बंद केला आहे. शेतीच्या मशागतीसाठी लागणारी ट्रॅक्टर, पॉवर टीलर शेतात नेऊ शकत नाही. त्यामुळे ती शेती ओसाड टाकावी लागत आहे. शेतकऱ्यांनी



शासनाकडे अर्ज विनंत्या केल्या शासकीय अधिकारी मंडळ अधिकारी, तलाठी यांनी प्रत्यक्ष येऊन परिस्थिती जाणून घेतली व तसा पंचनामा करून तहसिलदारांना अहवाल पाठविला. तहसिलदारांनीसुद्धा नोटीस पाठवून सदर मालकांना तशा सूचना केल्या, परंतु काहीही फरक पडला नाही.

किरण पाटील या शेतकऱ्याने शेतात नारळ, आंबा त्याचबरोबर उन्हाळा सरता सरता २० गुंठ्यांत भेंडीची लागवड केली. उत्पन्नही सुरू झाले. पावसाळा सुरू झाल्यानंतर मात्र पाणी निचरा होत नसल्याने सर्व भेंडीची रोपे कुजली. नारळ, आंब्याची रोपे मरुन गेली. अलिबाग तहसिलदारांनी या प्रकरणाची गंभीर दाखल घेऊन योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

# तळवली येथील बिर्ला कार्बन कारखान्यात चोरी

**खोपोली : प्रतिनिधी**

रसायनी पोलीस ठाणे हद्दीत असलेल्या बिर्ला कार्बन इंडिया लिमिटेड कारखान्यातून १६ हजार रुपये किमतीचे साहित्य चोरीला गेल्याची घटना घडली आहे.

तळवली येथे असणाऱ्या बिर्ला कार्बन कारखान्यातून चार हजार रुपये किमतीचे ४० लोखंडी पाईप आणि १२ हजार रुपये किमतीच्या ॲल्युमिनियम शिडी अज्ञात चोरटयाने चोरून नेली. ठेकेदार विजय हिरामण चव्हाण यांनी रसायनी पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध तक्रार दिली असून पोलिसांनी त्याप्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास महिला पोलीस हवालदार प्रियांका कांबळे करीत आहेत.

# पनवेल महापालिकेच्या शाळांमध्ये शिक्षण सप्ताह

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०च्या चौथ्या वर्धापन दिनानिमित्त २२ ते २८ जुलै या कालावधीत पनवेल महापालिका कार्यक्षेत्रातील २७० शाळांमध्ये शिक्षण सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे.

सोमवारी (दि.२२) अध्यापन साहित्य दिवसांतर्गत वर्धित शिक्षण, पर्यावरणीय शाश्वतता, कौशल्य विकास यावरती आधारित कार्यक्रम घेण्यात आले. मंगळवारी (दि.२३) मूलभूत संख्याज्ञान व साक्षरता दिवस साजरा करण्यात आला. या अंतर्गत पूर्व प्राथमिक शिक्षणामध्ये वाचनात प्राविण्य मिळवण्याच्या दृष्टीने विविध उपक्रम महापालिकेच्या दहा शाळांमध्ये राबविण्यात आले.

बुधवारी (दि.२४) क्रीडा दिवसांतर्गत क्रीडा आणि





स्वास्थ्यच्या दृष्टीने खिलाडूवृत्ती आणि नैतिक वर्तणूक यातील सकारात्मक वृत्ती विकसित करण्यासाठी विविध उपक्रम राबविले जाणार आहे. गुरुवारी (दि.२५) सांस्कृतिक दिवस साजरा करण्यात येणार आहे. यामध्ये भारताच्या सांस्कृतिक विविधतेला प्रोत्साहन देण्यासाठी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. शुक्रवारी (दि.२६) कौशल्य व डिजिटल उपक्रम दिवसाचे आयोजन करण्यात येणार आहे. यामध्ये शैक्षणिक यशोगाथा, डिजिटल शिक्षणाचे फायदे अशा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे.

तसेच शनिवारी (दि.२७) मिशन लाईफच्या दृष्टिक्षेपात इको क्लब उपक्रम व शालेय पोषण दिवस साजरा करण्यात येणार आहे. यामध्ये पर्यावरणातील गंभीर समस्या, हवामान बदल, मतदान आणि संसाधनांची कमतरता याबद्दल जागरुकता निर्माण करण्यात येणार आहे. रविवारी (दि.२८) समुदाय सहभाग दिवस साजरा करण्यात येणार आहे.

यामध्ये शिक्षण मंत्रालय अंतर्गत शालेय शिक्षण आणि साक्षरता विभागाद्वारे विद्यांजली या शालेय स्वयंसेवक व्यवस्थापन या कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात येणार आहे. या शिक्षण सप्ताहांतर्गत महापालिकेच्या १० शाळांमध्ये रोज नावीन्यपूर्ण उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात मतदार जागरूकता व नोंदणी अभियान

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व भारतीय जनता पार्टी कार्यालय खारघर यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवारी (दि.२३) मतदार जागरूकता व नोंदणी कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

रायगड जिल्ह्यातील आगामी विधानसभा निवडणुका लक्षात घेता नवीन मतदार नोंदणी व्हावी व मतदाराचा टक्का वाढवा यासाठी या मतदार जागरूकता व नोंदणी कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमासाठी खारघर भाजप युवा मोर्चा अक्षय लोखंडे, उपाध्यक्ष प्रवीण बेरा, सचिव आदित्य हासगे, संयोजक हार्दिक पटेल, सरचिटणीस भाजप युवा मोर्चा प्रथम पाटील व युवती संयोजिका युवा मोर्चा दुर्गा बन्सल यांनी उपस्थित राहून महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व त्यांची मतदार नोंदणी करून घेतली.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांनी सर्व विद्यार्थ्यांना लोकशाहीमध्ये मतदार म्हणून हक्क बजावणे किती महत्त्वाचे आहे याविषयी मोलाचे मार्गदर्शन केले व पुढील उपक्रमांसाठी शुभेच्छा दिल्या. या उपक्रमाचे आयोजन प्रा. प्रथमेश ठाकूर यांनी केले तसेच प्रा. राहुल कांबळे, प्रा. डॉ. महादेव चव्हाण, प्रा. मनोज यादव, प्रा. नीलम मोरे व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.



# हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे लघु चित्रपट महोत्सवाचे आयोजन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल शिवसेनेचे महानगरप्रमुख तथा माजी नगरसेवक ॲड. प्रथमेश सोमण यांनी शिव चित्रपट सेना यांच्या संयुक्त विद्यमाने हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे लघु चित्रपट महोत्सव २०२४चे आयोजन केले आहे. या फिल्म फेस्टिवलच्या पोस्टरचे अनावरण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते वर्षा निवासस्थानी पार पडले.

यादृारे महाराष्ट्रातील विविध होतकरू कलाकारांना यात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या स्पर्धेमध्ये सहभागी होणारे कलाकार महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ



शिंदे यांच्या राजकीय जीवनावर किंवा त्यांनी जनसामान्यांसाठी राबवलेल्या विविध योजनांचा लाभ सामान्य नागरिकांना कसा मिळाला यावर लघुपट म्हणजेच शॉर्ट फिल्म बनवणार आहेत. याचा दिमाखदार प्रीमियर पनवेलमध्ये सप्टेंबर महिन्यात करण्यात येणार असून विजेत्यांना लाखो रुपयांची बक्षिसे देण्यात येतील असे या उपक्रमाचे आयोजक प्रथमेश सोमण यांनी सांगितले.

या वेळी आमदार प्रकाश सुर्वे, प्रवक्त्या शितल म्हात्रे, पनवेल शहरप्रमुख प्रसाद सोनवणे, उपशहर प्रमुख अर्जुन परदेशी, शैलेश जगनाडे यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

# भाजप सोशल मीडिया सेल केंद्रीय समन्वयकपदी आमदार निरंजन डावखरे

**मुंबई : प्रतिनिधी**

भाजपच्या सोशल मीडिया सेल केंद्रीय समन्वयकपदी आमदार निरंजन डावखरे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. याबाबतचे पत्र पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले आहे.



आमदार निरंजन डावखरे यांनी नुकतीच राज्य विधान परिषदेच्या कोकण पदवीधर मतदारसंघाची निवडणूक बहुमताने जिंकली. सलग तिसऱ्यांदा त्यांनी बाजी मारली आहे. त्यांचा जनसंपर्क दांडगा असून सोशल मीडियात ते सक्रिय असतात. या माध्यमातून जनतेशी विशेषत: युवावर्गाशी ते संपर्कात असतात. त्यामुळे त्यांची भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंदशेखर बावनकुळे यांनी सोशल मीडिया सेल केंद्रीय समन्वयकपदी नियुक्ती केली आहे. याबद्दल आमदार डावखरे यांचे अभिनंदन होत आहे.

# सिडकोच्या बामणडोंगरी गृहसंकुलातील दुकानांच्या विक्री योजनेस प्रतिसाद

**नवी मुंबई : सिडको वृत्तसंस्था**

सिडकोच्या बामणडोंगरी गृहसंकुलातील २४३ दुकानांच्या विक्री योजनेस व्यावसायिकांचा अभूतपूर्व प्रतिसाद लाभला. मंगळवारी (दि.२३) सिडको भवन येथे या योजनेची संगणकीय सोडत काढून निकाल जाहीर करण्यात आला.

सिडकोतर्फे १४ मार्च रोजी सिडकोच्या बामणडोंगरी गृहसंकुलातील २४३ दुकानांच्या विक्रीची योजना जाहीर करण्यात आली होती. या योजनेद्वारे रस्ते, रेल्वे, अटल सेतू (एमटीएचएल) यांद्वारे उत्तम कनेक्टिव्हिटी लाभलेल्या उलवे नोडमधील बामणडोंगरी गृहसंकुलातील ही दुकाने विक्रीकरिता उपलब्ध करून देण्यात आली होती. सिडकोचे नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ उलवे नोडच्या नजीकच्या परिसरामध्ये आकारास येत आहे.

सिडकोच्या गृहनिर्माण योजनांची विश्वासार्हता आणि उलवे नोडसारख्या परिसरामध्ये मिळालेली व्यवसाय वृद्धीची संधी यांमुळे या योजनेला नागरिकांचा उत्तम प्रतिसाद लाभला. लहान, मध्यम व मोठ्या आकाराची दुकाने उपलब्ध असल्याने मोठ्या व्यावसायिकांप्रमाणेच लघु व मध्यम व्यावसायिकांकरिताही ही योजना लाभदायी ठरली आहे.

**सर्वसामान्यांचे घराचे स्वप्न पूर्ण करण्याबरोबरच विकासक, उद्योजक, व्यावसायिकांच्या हिताकरिता सिडकोतर्फे नेहमीच विविध योजना राबविण्यात येतात. या २४३ दुकानांच्या विक्री योजनेद्वारे अनेक व्यावसायिकांना वेगाने विकसित होणाऱ्या व उत्तम कनेक्टिव्हिटी लाभलेल्या उलवे नोडमध्ये आपला व्यवसाय सुरू करण्याची सुवर्णसंधी आहे. या योजनेला मिळालेल्या प्रतिसादामुळे सिडकोबद्दल नागरिकांच्या मनात असलेल्या विश्वासार्हतेवर शिक्कामोर्तब झाले आहे.**

**-विजय सिंघल, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक**



# सीकेटी विद्यालयात गुरूपौर्णिमा उत्साहात



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगु काना ठाकूर (सीकेटी) विद्यालयाच्या इंग्रजी माध्यम माध्यमिक विभागात मंगळवारी (दि.२३) गुरूपौर्णिमा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा झाला. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्रा. मेजर यु. टी. भंडारी व विद्यालयाच्या माजी संगीत शिक्षिका सुप्रिया ताम्हणकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती आणि गुरू व्यास यांच्या प्रतिमा पूजनाने झाली. यानंतर शालेय गायक वृंदाने प्रार्थना व स्वागतगीत सादर केले. विद्यालयातील संगीत शिक्षक रूपेश सर यांनी अभंग सादर केले. मुख्याध्यापक संतोष चव्हाण यांनी, गुरूचे महत्त्व सांगत विद्यार्थ्यांना गुरूपौर्णिमेच्या शुभेच्छा दिल्या. विद्यालयात कथाकथन स्पर्धा तसेच भाषण स्पर्धा घेण्यात आल्या होत्या. त्यातील इ. सातवीतील विद्यार्थी साईराज पाटील याने लोकमान्य टिळकांवर आधारित भाषण सादर केले. इ. नववीतील विद्यार्थ्यांनी भरतनाट्यम् नृत्यातून आपल्या गुरूंना गुरूवंदना अर्पण केली. विद्यालयातील शिक्षिका केशरी भोईर यांनी गुरूंचे महत्त्व सांगितले.

प्रज्ञाशोध परीक्षेतील विद्यार्थ्यांना पारितोषिक देवून गौरविण्यात आले. ऋतुजा म्हात्रे आणि तनिका प्रधान यांनी सूत्रसंचलन केले. या वेळी शिक्षक पालक संघ प्रतिनिधी राजेश्री नवासे, दिपाली गायकवाड, सुकन्या खोपकर, सर्व शिक्षक उपस्थित होते.

**निवडक**

## लोकमान्य टिळक यांना अभिवादन



**पनवेल** : भारतीय असंतोषाचे जनक, स्वातंत्र्य लढ्यातील अग्रणी लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या जयंतीनिमित्त पनवेल महानगरपालिकेच्या मुख्यालयात मंगळवारी (दि.२३) त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या वेळी अतिरिक्त आयुक्त भारत राठोड, उपायुक्त कैलास गावडे, उपायुक्त बाबासाहेब राजळे, सहाय्यक आयुक्त स्वरूप खारगे, जनसंपर्क अधिकारी वर्षा कुलकर्णी, महापालिका अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

## स्वर भक्तीधारा कार्यक्रम उत्साहात




**पनवेल** : सूर निरागस हो या सांगितिक समुहाचे सांस्कृतिक विकास मंडळ या संस्थेत रूपांतर झाल्यानिमित्त स्वर भक्तीधारा या सांगितिक मैफिलीचे आयोजन करण्यात आले. पनवेलमधील कश्यप हॉल येथे हा कार्यक्रम झाला. यामधे युवा गायिका चैत्राली देसाई, सानिका राजवाडे-नातू आणि सुशील अभंगे यांनी विविध अभंग व भक्तिगीतांचे गायन करून रसिक पनवेलकरांना मंत्रमुग्ध केले. आतंरराष्ट्रीय कीर्तीचे तबला वादक रामकृष्ण करंबेळकर यांनी तबला, अथर्व देव यांनी संवादिनी आणि अविनाश देव यांनी तालवाद्य साथ केली. वैशाली केतकर यांनी कार्यक्रमाचे निवेदन केले. सर्वेश गोखले यांनी ध्वनि संयोजन केले. कीर्तनभास्कर नंदकुमार कर्वे यांच्या हस्ते मंडळातील सर्व पदाधिकाऱ्यांचा सन्मान करण्ययात आला. या कार्यक्रमाला ज्येष्ठ शास्त्रीय गायक पं. मिलिंद गोखले, अजय भाटवडेकर, विनायक प्रधान आदींसह रसिक उपस्थित होते.

## वळवली येथून दुचाकीची चोरी

**पनवेल** : तालुक्यातील वळवली गावाच्या समाज मंदिरासमोर उभी करून ठेवलेली दुचाकी अज्ञात चोरट्यांनी चोरुन नेल्याची घटना घडली आहे. रमेश म्हस्कर यांनी त्यांची स्कुटी ही वळवली गावाच्या समाज मंदिरासमोर उभी करून ठेवली असता अज्ञात चोरट्यांनी सदर दुचाकी चोरून नेल्याने याबाबतची तक्रार खांदेश्वर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# हेटवणे धरणातील पाणीसाठा ७० टक्क्यांवर

### पाणीकपातीतून नागरिकांना मिळणार दिलासा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जून महिन्याच्या अखेरीस सिडको महामंडळाने हेटवणे धरण क्षेत्रातील जलसाठा कमी असल्याने २० टक्क्यांची पाणीकपात सिडको वसाहतींमध्ये अंमलात आणली. यामुळे पिण्याच्या पाण्यासाठी रहिवाशांना विकतचे पाणी वापरावे लागले, परंतु सोमवारी (दि.२२) हेटवणे धरण क्षेत्रात मागील चार दिवसांत बरसलेल्या मुसळधार पावसामुळे धरणातील जलसाठा ७० टक्क्यांवर पोहचला आहे. त्यामुळे लवकरच सिडको वसाहतींमधील पाणीकपात रद्द करण्याचे संकेत सिडको मंडळाकडून देण्यात आले आहे.

जून ते जुलै महिन्यात बाहेर धो धो पाऊस आणि घरातील नळांना काही मिनिटेच पाणीपुरवठा होत असल्याने खारघर, उलवे आणि द्रोणागिरी या वसाहतींमधील नागरिकांचे पाण्याविना हाल होत होते. मागील अनेक वर्षांत जुलै महिन्यात पाण्याचे दुर्भिक्ष पहिल्यांदा सिडकोवासियांनी अनुभवले. हेटवणे धरण पेण परिसरात आहे. मागील चार दिवसांत पेण तालुक्यात ५०० मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे. हेटवणे धरणाची क्षेत्राची क्षमता १४४ दशलक्ष घनमीटर एवढी असून चार दिवसांपूर्वी ४९ टक्के जलसाठा उपलब्ध होता.

सोमवारी सकाळी हेटवणे धरणात ७० टक्के पाणीसाठा असल्याची नोंद धरण व्यवस्थापनाकडे नोंदविली गेल्याने सिडकोवासियांची पाणी कपात लवकरच रद्द होईल, अशी चिन्हे आहेत. मागील महिनाभर उलवे, द्रोणागिरी आणि खारघरमधील वसाहतींना झालेल्या २० टक्के कपात आणि कमी दाबाने झालेल्या पाणी पुरवठ्यामुळे टँकरने पाणी खरेदी करावे लागले.

शेकडो रहिवाशांना पिण्याच्या पाण्यासाठी किराणा मालाच्या दुकानातून पाण्याचा बाटला खरेदी करून पाण्याची तहान भागवावी लागली. धरणात असाच पाऊस बरसल्यास ऑगस्ट महिन्यात धरण इशारा पातळी गाठण्याची शक्यता आहे.

## आमदार प्रशांत ठाकूर यांनी साधला कार्यकर्त्यांशी संवाद





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल ग्रामीणमधील भाजप कार्यकर्त्यांची आमदार प्रशांत ठाकूर यांनी सोमवारी भेट घेऊन त्यांच्यासोबत संवाद साधला. या भेटीदरम्यान त्यांनी सरकारने केलेली विकासकामे तसेच सरकाराच्या योजनांची माहिती नागरिकांना देण्याबाबत मार्गदर्शन केले.

माजी नगरसेवक संतोष भोईर यांच्या पेंधर येथील निवासस्थानी तुर्भे, करवले, तळोजे मजकूर, घोट, कोयनावेळे, पेठाली, फेज १, फेज २, कृष्णा पाटील यांच्या पडघे येथील निवासस्थानी नावडे, पडघे, तोंडरे, देविचापाडा, पालेखुर्द, नागझरी, ढोंगऱ्याचा पाडा तर नाथा आगलावे यांच्या कोळवाडी येथील निवास्थानी कोळवाडी, पाले बुद्रुक, फणसवाडी, वलप, कानपोली, नितळस, वावंजे, खैरणे विभागातील कार्यकर्त्यांची बैठक झाली.

या वेळी भाजपचे पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, जिल्हा सरचिटणीस दिपक भेहेरे, तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील, प्रल्हाद केणी, भुपेंद्र पाटील यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.





## नवीन पनवेल येथे वर्षावास कार्यक्रमाचा शुभारंभ

**पनवेल** : बुद्धगया प्रतिष्ठान अंतर्गत आम्रपाली बुद्धविहार आणि भारतीय बौद्ध महासभा, विभाग क्र. १४, नवीन पनवेल यांच्या वतीने रविवारी (दि. २१) वर्षावास प्रारंभ कार्यक्रमाचे आयोजन माजी नगरसेवक ॲड. प्रकाश बिनेदार यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष ज्येष्ठ पत्रकार श्याम साळवी हे होते.

वर्षावासाचे पाहिले पुष्प गुंफताना सेवानिवृत्त सरकारी सचिव, धम्मप्रवचनकार सुरेश सोनवणे यांनी वर्षावासाविषयीची माहिती दिली. माजी नगरसेवक ॲड. प्रकाश बिनेदार म्हणाले, या वर्षावास प्रारंभापासून ते वर्षावास समाप्तीपर्यंत म्हणजे १७ ऑक्टोबरपर्यंत या आम्रपाली बुद्धविहारात प्रत्येक गुरुवारी आणि प्रत्येक पौर्णिमेला धम्म प्रवचनाचे कार्यक्रम आयोजित केले आहे. त्यामुळे सर्व उपासकांनी या सर्व कार्यक्रमास उपस्थित राहावे, असे आवाहन त्यांनी केले.





**पनवेल** : तालुक्यातील शिवकर येथे युएनडीपी अंतर्गत भातपीक प्रात्यक्षिक शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रम घेण्यात आले. या वेळी कृषी सहाय्यक संगीता पाटील यांनी यूएनडीपी प्रकल्पाबाबत शेतकऱ्यांना माहिती दिली तसेच भातपिकाच्या श्री पद्धतीबाबत मार्गदर्शन केले. पंतप्रधान पीक विमा, कृषीच्या विविध योजनेबाबत माहिती दिली. या वेळी शिवकर ग्रामपंचायतीचे सरपंच आनंद ढवळे यांनी सौरऊर्जा, शेतकऱ्यांसाठी खत व बियाणे अवजारे यांची पतसंस्था स्थापन करण्याबाबत मार्गदर्शन केले. उपसरपंच प्रांजळ पाटील, सदस्य मंगेश ढवळे, गोटीराम ढवळे यांच्यासह शेतकरी उपस्थित होते.

## होमी भाभा बालवैज्ञानिक परीक्षेत 'सीकेटी'चे विद्यार्थी चमकले

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

विज्ञान शिक्षक परिषदेमार्फत घेण्यात येणाऱ्या बालवैज्ञानिक स्पर्धा परीक्षेत जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगु काना ठाकूर (सीकेटी) विद्यालयातील इंग्रजी माध्यमाच्या विद्यार्थ्यांनी सुयश प्राप्त केले आहे.



ही स्पर्धा दरवर्षी इयत्ता सहावी आणि नववीतील विद्यार्थ्यांकरीता घेण्यात येते. या परीक्षेत विद्यालयातून सहावीमधून ३० आणि नववीमधून ३० असे एकूण ६० विद्यार्थी परीक्षेसाठी प्रविष्ठ झाले होते. रोजच्या जीवनातील विज्ञानाचा उपयोग माहित व्हावा तसेच वैज्ञानिक दृष्टिकोन वृद्धिंगत होऊन विज्ञान विषयातील रस वाढावा या उद्देशाने या स्पर्धा परीक्षेचे आयोजन केले जाते. ही स्पर्धा कनिष्ठ पातळीतून विद्यार्थी निवडून उच्च पातळी स्पर्धा, नंतर प्रात्यक्षिक परिक्षा आणि शेवटी मुलाखत अशा स्वरूपाची असते.

२०२३-२४मध्ये झालेल्या या स्पर्धा परीक्षेत इयत्ता सहावीतील शर्वरी जाधव तर इयत्ता नववीतील आदित्य पवळे व सोहम सुधीर ठाकूर यांची प्रात्यक्षिक परीक्षेसाठी निवड झाली आहे, तसेच इयत्ता सहावीमधून पाच विद्यार्थी व इयत्ता नववीमधून दोन विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्रक देऊन गौरविण्यात आले.

विद्यालयातील विज्ञान विषय शिक्षकांनी विशेष मार्गदर्शन करून विद्यार्थ्यांची या स्पर्धा परीक्षेसाठी तयारी करून घेतली, तसेच विद्यार्थ्यांनी अभ्यास करून हे सुयश संपादन केले आहे, असे मुख्याध्यापक संतोष चव्हाण यांनी सांगितले आणि यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

त्याचप्रमाणे सर्व विद्यार्थ्यांचे संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, अध्यक्ष अरूणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, सचिव डॉ. एस. टी.गडदे, संस्थेचे सर्व पदाधिकारी, पर्यवेक्षक, मार्गदर्शक शिक्षक यांनी अभिनंदन केले.

# स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांनी अभ्यासाला महत्त्व द्यावे

### भाजप नेते अरुणशेठ भगत यांचे मार्गदर्शन





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सध्या स्पर्धेचे युग असल्यामुळे चांगले भविष्य घडवण्यासाठी विद्यार्थ्यांनी अभ्यासाला महत्त्व दिले पाहिजे, असे प्रतिपादन भाजपचे पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी मंगळवारी (दि.२३) वह्या वाटपाच्या कार्यक्रमावेळी केले.

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळातर्फे दरवर्षी विद्यार्थ्यांना वह्यावाटप करण्यात येते. ही परंपरा कायम राखत विचुंबे येथील राजिप शाळेत तसेच रिटघर येथील रयत शिक्षण संस्थेच्या भैरवदेव विद्यालय आणि लोकनेते रामशेठ ठाकूर विद्यालयात आणि जि.प. शाळेत मोफत वह्यावाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी भाजपचे पनवेल तालुकाध्यक्ष तथा श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे उपाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप करण्यात आले.



या कार्यक्रमांवेळी भाजपचे तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील, राजिप माजी सदस्य अमित जाधव, पं.स.चे माजी सदस्य भूपेंद्र पाटील, शिवकरचे सरपंच आनंद ढवळे, विचुंबेचे सरपंच प्रमोद भिंगारकर, उपसरपंच स्वाती पाटील, दुंदरे ग्रामपंचायतीचे सदस्य शांताराम चौधरी, प्रलय भोपी, गुरुनाथ भोपी, स्कूल कमिटी सदस्य कृष्णा पाटील, माजी सरपंच बळीराम पाटील, माजी उपसरपंच भाई भोईर, विभागीय अध्यक्ष किशोर सुरते, सदस्य बी.डी.पाटील, आप्पा गायकवाड, प्रगती गोंधळी, श्रावणी भोईर, चेतन सुरते, अविनाश गायकवाड, आनंद गोंधळी, दादा गोंधळी, अनिल भोईर, युवा मोर्चा सरचिटणीस विश्वजित पाटील, बूथ अध्यक्ष कल्पेश भोईर, गणेश भोपी, चिपळे ग्रामपंचायतीचे सदस्य मुकेश फडके, भगवान भोपी, गुलाब भोपी, विलास भोपी, राजेश भोपी, पोलीस पाटील दीपक पाटील, अमर शेळके, मुख्याध्यापक अनंत पालवणकर यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

## बीसीटी लॉ कॉलेजमध्ये विद्यार्थी परिषद परिचय कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सांस्कृतिक समिती आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील भागुबाई चांगू ठाकूर (बीसीटी) विधी महाविद्यालय येथे विद्यार्थी परिषद परिचय कार्यक्रम २०२४-२५चे आयोजन करण्यात आले होते.



कार्यक्रमाचे आयोजन आयक्यूएसी समन्वयक सहाय्यक प्रा. राघव शर्मा, राष्ट्रीय दिन उत्सव समितीचे समन्वयक सहाय्यक प्रा. संग्राम पवार व सांस्कृतिक समितीच्या समन्वयक सहाय्यक प्रा. सानिका पात्रे यांनी प्राचार्य सानवी देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली केले. कार्यक्रमाची सुरुवात सहाय्यक प्रा. राघव शर्मा यांच्या हृदयस्पर्शी भाषणाने झाली. त्यानंतर संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणा दिली आणि विद्यार्थी परिषदेचा एक भाग बनून विद्यार्थी उत्कृष्टता प्राप्त करू शकते यावर भर दिला. त्यानंतर संबंधित विद्यार्थी प्रतिनिधींचा सत्कार करून कार्यक्रम पार पडला.

विद्यार्थी परिषदेच्या सदस्यांची नियुक्ती महाराष्ट्र विद्यापीठ कायद्यानुसार करण्यात आली. प्रेरणा गायकवाड हिची सरचिटणीसपदी, चैत्राली काणे हिची सहसचिवपदी आणि विविध उपक्रमांसाठी इतर प्रतिनिधींची निवड झाली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हुमांशु मेशाराम आणि मृणाल पाटेकर हिने आभार मानताना संस्थेचे अध्यक्ष माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे सतत सहकार्य व मार्गदर्शक म्हणून कृतज्ञता व्यक्त केली.

## संपादकीय

# संतुलित अर्थभान!

भारत विकासाच्या वाटेवर किती गांभीर्याने वाटचाल करत आहे याचे ठळक प्रत्यंतर मंगळवारी केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामप यांनी संसदेत जो अर्थसंकल्प मांडला, त्यामध्ये दिसून आले. अतिशय संतुलित, भविष्यावर नजर ठेवून तयार केलेला, शेतकरी व तळागाळातील जनतेबरोबरच करदात्या मध्यमवर्गाचेही हित जपणारा असा हा अर्थसंकल्प आहे.

**कोरोना काळात जगभरात जो भयंकर उत्पात झाला, त्याची किंमत अजूनही बहुतेक सर्वच देशांना मोजावी लागत आहे. या काळात मनुष्यहानीबरोबरच जगाची अर्थव्यवस्था पार कोलमडून गेली. महासत्ता म्हणवणाऱ्या देशांचाही नक्षा उतरला. अनेक प्रगत देशांचे ठोकळ उत्पन्न घटले आणि मोठ्या चलनवाढीला तोंड द्यावे लागले. आजही अनेक प्रगत देशांमध्ये चलनवाढीचा दर दोन अंकी आहे. चलनवाढीचा थेट परिणाम होतो तो किंमती वाढण्यावर म्हणजेच महागाईवर. त्या मानाने भारतीय अर्थव्यवस्था सुस्थितीतच आहे, असे म्हणावे लागेल. कारण आजही चलनवाढीचा दर भारतात सहा टक्क्यांच्या आसपास नियंत्रित राहिला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या डोळस आणि सजग नेतृत्वामुळेच हे शक्य झाले, हे वेगळे सांगायची आवश्यकता नाही. मंगळवारी केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी संसदेत जो अर्थसंकल्प मांडला, त्यामध्ये कृषीक्षेत्रासाठी तब्बल दीड लाख कोटी रुपयांहून अधिक रकमेची तरतूद करण्यात आली असून ग्रामविकासासाठीही तब्बल दोन लाख ६६ हजार कोटींहून अधिक रक्कम राखून ठेवण्यात आली आहे. रोजगार निर्मिती आणि कौशल्यविकासावर भर देणारा हा अर्थसंकल्प नऊ महत्त्वाच्या घटकांवर बेतलेला आहे. कृषि उत्पादकता आणि लवचिकता, रोजगार आणि कौशल्य, सुधारित मानवी संसाधने आणि सामाजिक न्याय, उत्पादन आणि सेवा, शहरांचा विकास, ऊर्जा सुरक्षा, पायाभूत सुविधा, नवकल्पना आणि संशोधन-विकास आणि पुढील पिढीसाठी आवश्यक त्या सुधारणा असे हे नऊ घटक आहेत. एका अर्थी भविष्यातील अर्थसंकल्प याच नऊ घटकांच्या आधारे आखले जातील, असा हा रोडमॅपच म्हणावा लागेल. मोदी सरकार फक्त आपल्याच पठडीतील राज्यांना मदत करते, असा आरोप नेहमी केला जातो. तो किती फोल आहे, हेदेखील या अर्थसंकल्पातून स्पष्ट होते. या अर्थसंकल्पात निर्मला सीतारामन यांनी आंध्र प्रदेशला १५ हजार कोटींचे विकाससाह्य आणि बिहारला जवळपास ४० हजार कोटींचे अर्थसाह्य मंजूर केल्याचे जाहीर केले. या दोन्ही पक्षांच्या पाठिंब्यावर सध्याचे राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे सरकार उभे आहे. तथापि, विशेष दर्जा मिळावा यासाठी ही दोन्ही राज्ये प्रयत्नशील होती. त्यांची ती मागणी मान्य झालेली नाही. उलटपक्षी, ओरिसासोबत पश्चिम बंगाल, झारखंड आदी राज्यांसाठीही भरीव निधी मंजूर केला गेला आहे. बिहारमध्ये रस्त्यांचे जाळे उभे करण्याची महत्त्वाकांक्षी योजना आहे. पायाभूत सुविधांसाठी हा निधी आहे हे लक्षात घ्यायला हवे. महाराष्ट्राला मात्र काहीही मिळाले नाही अशी ओरड करण्यात येत आहे. तथापि, अनेक केंद्रीय योजनांचा लाभ तसाही महाराष्ट्राला मिळणारच आहे हे लक्षात घ्यायला हवे. मध्यमवर्गीयांसाठी कररचनेतील लाभकारी बदल हे या अर्थसंकल्पाचे आणखी एक वैशिष्ट्य ठरावे. नव्या कररचनेनुसार करदात्यांचे किमान साडेसतरा हजार रुपये वाचणार आहेत, ही अतिशय स्वागतार्ह गोष्ट आहे. येत्या काळात मोठ्या प्रमाणात नवे रोजगार निर्माण करण्याचे उद्दिष्ट ठेवणारा हा अर्थसंकल्प युवा पिढीसाठी वरदान ठरेल असाच मानायला हवा. एकंदरित, भारताचे भविष्य उज्ज्वल असल्याची खात्री देणाराच हा अर्थसंकल्प आहे.**

# वर्षासहलीला जाताना सावधगिरी बाळगा!





**खबरबात**
**नितीन देशमुख**

लग्नसोहळ्याच्या निमित्ताने अन्सारी कुटुंबीय आणि नातेवाईक एकत्र आले होते. चार दिवसांपूर्वी लग्न झाले. घरात आनंदाचे वातावरण होते. लग्नासाठी आग्रा येथून नातेवाईकांसह अन्सारी कुटुंबीय पावसाळी पर्यटनासाठी लोणावळ्याला गेले, मात्र धबधब्याच्या पाण्याची पातळी अचानक वाढल्याने अन्सारी कुटुंबातील १० जण वाहून गेले. पाच जण सुखरूप बाहेर पडले, पण पाच जण वाहून गेले. ताम्हिणीतील प्लस व्हॅलीमध्ये गेलेला पिंपरी-चिंचवडचा स्वप्नील धावडे धबधब्यात खेळताना पाण्याचा अंदाज न आल्याने शनिवारी धबधब्यातून वाहून गेला. या बातम्या ऐकल्यावर मन सुन्न होत.

वर्षापर्यटन करण्यासाठी जेवढा उत्तम तेवढाच तो अपघातांच्या दृष्टिकोनातून वाईट. पावसाळ्यात होणारे बहुतेक अपघात अतिआत्मविश्वास किंवा परिसराचे नसलेले भौगोलिक ज्ञान या गोष्टींमुळे होतात. पावसाळ्यात कुठल्याही सहलीला किंवा ट्रेकला जाताना त्या ठिकाणाची, तेथे जाणाऱ्या विविध वाटांची पूर्ण माहिती करून घेणे. जर त्या ठिकाणी पहिल्यांदाच जाणार असाल, पाऊस पडत असेल, दाट धुके आणि वादळी वाऱ्यात गावातील एखादा मार्गदर्शक घेणे कधीही चांगले, पण बऱ्याचवेळा एखाद्या ठिकाणाची माहिती मित्रांकडून किंवा नेटवरून घेतलेली असते. त्या माहितीच्या आधारे पर्यटक त्या ठिकाणी जाण्याचा प्रयत्न करतात, परंतु त्या ठिकाणाची योग्य माहिती नसल्यामुळे वाट चुकतात. प्रसंगी आपला जीवपण गमावून बसतात. बहुसंख्य होणारे अपघात त्या ठिकाणी असलेल्या धोक्यांची माहिती नसणे, दिलेल्या सूचनांचे पालन न करणे या गोष्टींमुळे होतात.

महाराष्ट्रामध्ये सध्या सगळीकडे पावसाचा जोर असून जवळपास पावसाळा सुरू होऊन एक ते सव्वा महिन्याचा कालावधी लोटला आहे. त्यामुळे आता सगळीकडे नदी नाले, ओढे आणि धबधबे प्रवाहित झाल्याचे दिसतात. त्यामुळे पर्यटकांची पावले अशा निसर्गसौंदर्याने नटलेल्या स्थळांकडे वळताना आपल्याला दिसून येत आहेत व मोठ्या प्रमाणावर अशा पर्यटनस्थळांवर गर्दी होत आहे.

पावसाळ्यामध्ये बहुसंख्य पर्यटक हे निसर्ग पर्यटनस्थळांना भेट देतात व त्या ठिकाणी असलेले धबधबे पाहण्याला मोठ्या प्रमाणावर या कालावधीत पसंती दिली जाते. धबधबे हा एक निसर्गाचा उत्कृष्ट आविष्कार असतो हे आपल्याला माहिती आहे. त्यामुळे रिमझिम पडणाऱ्या पावसाळ्यात अशा ठिकाणी भेट देणे म्हणजे जणू स्वर्गालाच भेट देण्यासारखे होते.

पावसाळ्यात निसर्गाचे सौंदर्य पाहण्यासाठी जाणे, त्यासाठी कौटुंबिक किंवा मित्र-मैत्रिणींसोबत सहल आयोजित करणे ओघानेच आले. अशा सहलींच्या माध्यमातून पावसाळ्यात प्रवास करणे हा रोमांचक आणि अनोखा अनुभव असू शकतो, परंतु सुरक्षित आणि आनंददायी प्रवास सुनिश्चित करण्यासाठी काही अतिरिक्त सावधगिरी बाळगणेदेखील आवश्यक आहे. पावसाळ्यात पर्यटनासाठी जाताना काही गोष्टींची काळजी घेणे आवश्यक आहे. पर्यटन सहलीचे आयोजन करताना पहिल्यांदा आपले स्थान निश्चित करा. तेथील नैसर्गिक स्थिती, भूभाग आणि सांस्कृतिक वातावरण आदी गोष्टी विचारात घ्या. शिवाय त्या ठिकाणी सुरक्षेची स्थिती आणि हवामानाचा अंदाज याबाबत सतत अद्ययावत माहिती घेत राहा. या स्थळांवरील अचानक होणाऱ्या हवामान बदलांसाठी तयार राहा. मगच पुढील आखणी करा.

रेनकोट, पोंचो, वॉटरप्रूफ शूज आणि छत्र्यांसह जलरोधक आणि जलद वाळणारे कपडे सोबत घ्या तसेच काही हलके नरम आणि उबदार कपडे पॅक करा. सुखण्यास फार वेळ घेणारे कपडे शक्यतो टाळाच. ते न सुकल्याने कुबट वास येत राहतो आणि काचल्याने शरीराला संसर्गही होण्याचा धोका वाढतो.

प्रवासाला निघताना योग्य पादत्राणांची निवड करा. शक्यतो लेदर, कॅन्वासचे शूज, चप्पल, सँडल टाळा. वॉटरफ्रूप शूज, सँडल केव्हाही चांगले. शक्यतो शूज किंवा सँडल वापरण्यास प्राधान्य द्या. चप्पल निसरड्या वातावरणात, जमीनीवर घसरण्याचा धोका अधिक असतो. त्यामुळे पायासोबत घट्ट राहतील आणि घसरणार नाहीत अशीच पादत्राणे वापरा.

पर्यटनासाठी धबधबे, डोंगरकपारी अथवा तशीच निसर्गसमृद्ध असलेली ठिकाणी निवडली जातात. अशा वेळी भूस्खलन, पूरस्थिती अशी शक्यता असलेली ठिकाणे टाळा. पावसाळा आणि थंडी असली तरी हायड्रेटेड राहण्याचे लक्षात ठेवा. विशेषतः दमट परिस्थितीत. भरपूर पाणी प्या आणि अल्कोहोल आणि कॅफिनचे जास्त सेवन टाळा. सुरक्षिततेच्या टिपा आणि पावसाळ्यात टाळण्याच्या क्षेत्रांबद्दल स्थानिकांचा किंवा सहल मार्गदर्शकांचा सल्ला घ्या. ते आपल्याला माहितीपूर्ण निर्णय घेण्यास मदत करू शकतात. प्रथमोपचार किट व तुमची नियमीत औषधेही सोबत ठेवा.


हवामानामुळे प्रवासाला होणारा विलंब किंवा योजनांमधील बदलांसाठी तयार रहा. सकारात्मक दृष्टीकोन ठेवा आणि तुमच्या सहलीचा जास्तीत जास्त फायदा घ्या. कधी कधी लक्ष विचचित करणाऱ्या घटना घडू शकतात. त्याकडे दुर्लक्ष करा फक्त काळजी घ्या. पावसाळी सहलीचे आयोजन करताना योग्य खबरदारी घेतल्यास पावसाळ्यात प्रवास करताना तुम्हाला अधिक सुरक्षित आणि आनंददायी अनुभव घेता येईल.

तुमच्या सुरक्षिततेला नेहमी प्राधान्य द्या आणि स्थानिक हवामान आणि सल्ल्याकडे लक्ष द्या. लक्षात ठेवा तुम्ही सहलीवर निघाला आहात. कार्यालयीन कामावर नव्हे. त्यामुळे आवश्यक तो मोकळेपणा ठेवा. योग्य ती काळजी ठेवा. मग तुमच्या आनंदात अधिक भर पडेल.




## व्हॉट्सॲपवर इंटरनेटशिवायही पाठवता येणार मोठ्या फाईल्स

व्हॉट्सॲप आपल्या युजर्ससाठी वेळोवेळी नवनवीन फीचर्स आणत असतं. आता कंपनी एक अतिशय उपयुक्त फीचर आणत आहे, जे तुमच्यासाठी खूप फायदेशीर ठरणार आहे. व्हॉट्सॲप एका फाईल शेअरिंग फीचरवर काम करत आहे, ज्याद्वारे युजर्स इंटरनेटशिवाय जवळच्या लोकांसोबत मोठ्या फाइल्स शेअर करू शकतील. म्हणजेच आता युजर्सना इंटरनेटवर अवलंबून राहावं लागणार नाही.




WABetaInfoने आपल्या रिपोर्टमध्ये या कमाल फीचरबद्दल माहिती दिली आहे आणि सांगितलं आहे की, व्हॉट्सॲप २४.१५.१०.७० iOS साठी बीटामध्ये विकसित केलं जात आहे. या फीचरबद्दल रिपोर्टमध्ये असं म्हटलं आहे की आयफोनवर People Nearby हे फीचर नंतर उपलब्ध होऊ शकतं.

हे फीचर कसं करतं काम?

WABetaInfo ने शेअर केलेल्या स्क्रीनशॉटमध्ये हे स्पष्टपणे दर्शविलं आहे की फाइल iOS मेकॅनिझममध्ये शेअर करण्यासाठी QR कोड स्कॅन करावा लागेल. हे कॉन्टॅक्ट्स आणि व्हॉट्सॲप अकाऊंटमध्ये फाईल शेअरिंग करण्यासाठी मदत करेल. ज्या भागात इंटरनेट कनेक्टिव्हिटी खूप कमी आहे अशा भागात हे फीचर अतिशय उपयुक्त ठरणार आहे आणि युजर्सना त्यांचा डेली डेटा वाचवण्यासही मदत होणार आहे.

सध्या हे फीचर विकासाच्या टप्प्यात आहे आणि लवकरच हे फीचर Android आणि iOS प्लॅटफॉर्मवर सपोर्ट करू शकतं. या फीचरची एक खास गोष्ट अशी आहे की, यामध्ये तुम्हाला एंड-टू-एंड एन्क्रिप्शन दिलं जाईल जेणेकरुन फक्त रिसीव्हर माहिती घेऊ शकेल, मात्र हे फीचर कधी रिलीज होणार याबाबत कोणतीही माहिती समोर आलेली नाही. सोशल नेटवर्किंग साईट्सपैकी व्हॉटस्ॲप हे मेसेजिंग ॲप जगभरात लोकप्रिय आहे. सर्वच जण त्याचा वापर करतात. केवळ मनोरंजनच नव्हे; तर दैनंदिन, कार्यालयीन कामातही याचा उपयोग होतो. विशेष म्हणजे व्हॉट्सॲपची कंपनी मेटा यामध्ये वारंवार सुधारणा करीत असते. त्याचप्रमाणे नवनवी फिचर्स देत असतात. आता मोठ्या फाईल्ससंबंधी सुविधा देण्यात येत आहे.

# प्रख्यात बासरीवादक पन्नालाल घोष



**निमित्त**

पन्नालाल घोष हे एक प्रख्यात बासरीवादक होते. त्यांचे पूर्ण नाव अमल ज्योती घोष असे होते. त्यांनी बासरी या वाद्यात अनेक सुधारणा केल्या तसेच बासरी वादन हे भारतीय गायकीच्या जवळ नेऊन ठेवले. पन्नालाल घोष यांचा आज स्मृतीदिन आहे. त्यानिमित्त त्यांच्याविषयी जाणून घेऊया या लेखातून...

पन्नालाल घोष यांचा जन्म २४ जुलै १९११ रोजी बारिसाल (बांगलादेश) येथे झाला. त्यांचे वडील अक्षयकुमार घोष हे उत्तम सतारवादक होते. वयाच्या चौदाव्या वर्षीच पन्नालाल बासरीकडे आकृष्ट झाले. पुढे १९३४मध्ये त्यांनी मास्टर खुशी महम्मद या संगीतकाराचे शिष्यत्व पत्करले. 'सराईकेला नृत्यमंडळी'त ते काही काळ संगीत दिग्दर्शक होते. 'सराईकेला नृत्यमंडळी'बरोबर १९३८मध्ये पन्नालाल यांना युरोपचा प्रवास घडला. गिरिजा शंकर चक्रवर्ती यांच्याकडे १९३९मध्ये आणि पुढे १९४७च्या सुमारास उस्ताद अल्लाउद्दीन खाँ यांच्याकडे पन्नालाल यांनी संगीताचे अधिक शिक्षण घेतले.

पन्नालाल घोष हे चित्रपटक्षेत्रात १९४० ते १९४४ या काळात संगीत दिग्दर्शक म्हणून होते व पुढेही तेथेच १९५६पर्यंत बासरीवादक होते. या काळात त्यांनी बासरीवादनाचे स्वतंत्र कार्यक्रमही केले. आकाशवाणीच्या दिल्ली केंद्रात १९५६पासून ते वाद्यवृंद निर्देशक होते. पन्नालाल घोष हे १९४० साली मुंबई येथे वास्तव्यास होते. त्यांनी बॉम्बे टॉकीजमध्ये संगीत दिग्दर्शकाचे आणि बासरीवादनाचे काम केले. त्यांनी बासरीत अमुलाग्र परिवर्तन घडविले. बासरीची लांबी ४०-४२ इंचांपर्यंत वाढविली तसेच बासरीवर बोटे ठेवण्याचे वेगळे तंत्र विकसित केले. पंडितजींनी अनेक नवीन रागांची निर्मिती केली. त्यातील राग जयंत हा एक महत्त्वाचा राग आहे.

पन्नालाल घोष हे बासरीवादनाच्या क्षेत्रातील एक युगप्रवर्तक होत. वेणुवादनाला भारतात दीर्घकालीन इतिहास असला तरी बासरीवादनाला एक स्वतंत्र व स्वायत्त दर्जा मिळवून देण्यात पन्नालाल यांचा फार मोठा वाटा होता. ख्यालगायनातील आलापासारखे विलंबित संगीतविस्तार आणि सतार, सरोद इ. तंतुवाद्यातील 'झाला'सारखे द्रुत वादनप्रकार या दोहोंना बासरीवादनात अंतर्भूत करून पन्नालाल यांनी या वाद्याची सांगीतिक विकसनक्षमता विस्तृत केली. यासाठी त्यांनी संशोधन करून मोठ्या व्यासाची, अधिक लांबीची व परिणामतः अधिक स्वरक्षेत्राची बासरी तयार केली. अर्ध, पाव इ. स्वरांतरे आणि मिडकामासारखे संगीतालंकार बासरीवादनातून यशस्वी करून दाखविले.

संगीत दिग्दर्शक आणि रचनाकार म्हणूनही पन्नालाल यांनी कीर्ती मिळविली. त्यांच्या इतजार, बसंत ह्या चित्रपटांच्या संगीतरचना व 'आशा', 'बागेश्री', 'ऋतुराज', 'कलिंगविजय', 'भैरवी', 'ज्योतिर्मय अमिताभ' इ. वाद्यवृंदरचना गाजल्या आहेत. त्यांच्या शिष्यगणांत हरिप्रसाद चौधरी, देवेंद्र मुर्डेश्वर, बेडा देसाई इ. प्रसिद्ध बासरीवादकांचा समावेश होतो. अशा या श्रेष्ठ बासरीवादकाचे २० एप्रिल १९६० रोजी निधन झाले.

**(साभार : मायमहानगर)**

**क्लिक...क्लिक...!**



**पनवेल : पावसाळ्यात जेएनपीए मार्गावरील टी पॉईंटजवळ डोंगरातून येणाऱ्या पाण्याचे छोटेखानी धबधबे तयार होतात. पर्यटक सुट्टीच्या दिवशी तेथे आनंद लुटण्यासाठी जात असतात.** (छाया : जीवन केणी)

## आरोग्य प्रहर

## सांध्याची सूज व वेदना संपवते हे घरगुती उपाय

अर्थरायटिस किंवा संधिवात हा एक असा आजार आहे, ज्यामुळे सांध्यांवर सूज चढते व प्रचंड वेदना सुरू होतात. याकडे दुर्लक्ष केल्यास हाडांचे गंभीर आजार होऊ शकतात. खाली दिलेले सोपे उपाय करून तुम्ही वेदना आणि सूजेपासून आराम मिळवू शकता.



अर्थरायटिसहा एक सामान्य परंतु त्रासदायक आजार आहे, ज्यामुळे सांधेदुखी, सूज आणि अस्वस्थता होते. हा आजार केवळ वयोवृद्धांमध्येच नाही तर काही वेळा तरुणांमध्येही दिसून येतो. यासाठी औषधोपचार आवश्यक असले तरी काही घरगुती उपायदेखील यावर प्रभावी ठरू शकतात.

आल्याचा चहा : आल्यामध्ये आढळणारे जिंजरोल हे घटक अँटी-इंफ्लेमेटरी आणि अँटीऑक्सिडंट गुणधर्म असतात. आले सेवन केल्याने सांध्यातील सूज आणि वेदना कमी होतात. एक कप पाणी गरम करा. त्यात एक चमचा किसलेले आले घाला. ५-१० मिनिटे उकळा. चहा गाळून त्यात मध किंवा लिंबाचा रस घाला. हा चहा दिवसातून दोनदा प्या.

हळद : हळदीत असलेल्या कर्क्युमीन या घटकामुळे ते एक प्रभावी अँटी-इंफ्लेमेटरी आणि अँटीऑक्सिडंट ठरते. एक कप गरम दूध घ्या. त्यात एक चमचा हळद घाला. चवीसाठी थोडे मध घालू शकता. हे दूध रात्री झोपण्यापूर्वी प्या. हळदीचे दूध नियमित प्यायल्याने सांधेदुखी कमी होते आणि शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढते.

दालचिनी : दालचिनीत अँटी-इंफ्लेमेटरी आणि अँटीऑक्सिडंट गुणधर्म असतात. एक कप गरम पाण्यात अर्धा चमचा दालचिनी पावडर घाला. त्यात एक चमचा मध घाला. हे पेय दररोज सकाळी प्या. दालचिनीचे नियमित सेवन केल्याने सांधेदुखी कमी होते आणि सांध्यातील सूज उतरते.

ॲप्पल सायडर व्हिनेगर : ॲप्पल सायडर व्हिनेगरमध्ये असलेले पोटॅशियम आणि अँटीऑक्सिडंट्स सांध्यातील विषारी द्रव्ये बाहेर काढण्यास मदत करतात. एक ग्लास गरम पाण्यात दोन चमचे सफरचंद साइडर व्हिनेगर घाला. त्यात एक चमचा मध घाला. हे पेय दिवसातून दोनदा प्या.

गरम पाण्याच्या पिशवीने शेकवा : गरम पाण्याची पिशवी प्रभावित सांध्यावर १०-१५ मिनिटे ठेवा. दिवसातून दोनदा करा.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com

## लाडकी बहीण योजनेला रायगडात उत्स्फूर्त प्रतिसाद

# एक लाख ८९ हजार महिलांनी भरले अर्ज

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत असून २२ जुलैपर्यंत एक लाख ८९ हजार तीन महिलांचे अर्ज प्राप्त झाले आहेत. उर्वरित पात्र महिलांनी आपले अर्ज मुदतीत भरावेत, असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्या माध्यमातून करण्यात आले आहे.

राज्य सरकारने महिलांच्या सक्षमीकरणासाठी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेची घोषणा केली आहे. या योजनेंतर्गत एकही पात्र महिला लाभापासून वंचित राहू नये यासाठी प्रशासनाने योग्य नियोजन केले आहे. या योजनेच्या प्रसिद्धीसाठी गावागावात बैठकांचे आयोजन करण्यात येत आहे. ग्रामसभेच्या माध्यमातून जनजागृती करण्यात येत आहे.

**ऑफलाईनही अर्ज स्वीकारणार**

**या योजनेत नारीशक्ती या ॲपवरून सुरुवातीला ऑनलाईन अर्ज करावा लागत होता, मात्र एकाच वेळी अनेकजण अर्ज करीत असल्याने सर्व्हर संथ गतीने चालत होते. त्यामुळे ऑफलाईन अर्जही स्वीकारण्याचे निर्देश शासनाने दिले आहेत. त्यामुळे कागदपत्रांसह लेखी अर्ज करून तो स्वीकारण्यात येत आहे. जिल्ह्यात २२ जुलैपर्यंत एक लाख २३ हजार ८१५ महिलांनी ऑनलाईन तर ६५ हजार १८८ महिलांनी ऑफलाईन योजनेचा लाभ मिळावा यासाठी अर्ज केले आहेत.**

योजनेच्या अनुषंगाने सर्व अंगणवाडीसेविका व पर्यवेक्षिका यांना प्रशिक्षण देण्यात आले आहे. जिल्ह्यात विविध ठिकाणी अर्ज भरण्याची सुविधा उपलब्ध आहे. आवश्यक कागदपत्रांविषयी महिलांना मार्गदर्शन करण्यात येत आहे.

या सर्व प्रयत्नांना यश मिळाले असून, रायगड जिल्ह्यात दररोज पात्र महिला मोठ्या संख्येने योजनेचा लाभ मिळण्यासाठी अर्ज दाखल करीत आहेत.

# कर्जतमध्ये ३० भजनी मंडळांमध्ये रंगली स्पर्धा



**कर्जत : प्रतिनिधी**

पं. स. माजी उपसभापती मनोहर थोरवे आणि आमदार महेंद्र थोरवे फाउंडेशनचे माध्यमातून भजन भूषण स्व. गजानन बुवा पाटील संगीत भजन स्पर्धेचे आयोजन पोसरी येथील शिवतीर्थ सभागृहात करण्यात आले. स्पर्धेत कर्जत आणि खालापूर तालुक्यातील टॉप ३० भजनी मंडळांची निवड करण्यात आली होती.

स्पर्धेचा शुभारंभ आमदार महेंद्र थोरवे यांनी छत्रपती शिवजी महाराज आणि स्व. भजन भूषण गजाननबुवा पाटील यांच्या प्रतिमांचे पूजन करून तसेच दीपप्रज्वलन करून झाली. या वेळी हभप सदाशिव थोरवे, रंभाजी थोरवे, संभाजी थोरवे, सुंदरबाई थोरवे तसेच माजी उपसभापती मनोहर थोरवे, मनीषा थोरवे, मीना थोरवे, मनीषा भासे, विश्वनाथ थोरवे, माजी नगरसेवक संकेत भासे, युवासेना कर्जत विधानसभा मतदारसंघ प्रमुख प्रसाद थोरवे, प्रसादबुवा पाटील, कन्या सुचित्रा वांजळे, गजाननबुवा पाटील स्मारक समितीचे अध्यक्ष दीपक करोडे आदी उपस्थित होते.

स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून गायक श्रीधर भोसले, ज्येष्ठ पखवाज वादक मधुकर घोंगडे आणि तबलावादक विवेक भागवत उपस्थित होते. स्पर्धेत जय हनुमान प्रा. भजन मंडळ नेवाळी, स्वराजंली भजन मंडळ इंजिवली, श्रीराम भजन मंडळ निबोंडे, विठ्ठल रखुमाई प्रा. भजन मंडळ सालपे, एकविरा प्रा. भजन मंडळ अरवंद, नादब्रह्म भजन मंडळ तिघर, विठ्ठल रखुमाई प्रा. भजन मंडळ बिरदोले, श्रीपतीबाबा प्रा. भजन मंडळ तुंगी, जय हनुमान प्रा. भजन मंडळ अंत्रट नीड, स्वरनिषाद भजन मंडळ शेलु, ओमकार प्रा. भजन मंडळ आसरोटी, शिरसाई प्रा. भजन मंडळ शिरसे, जय हनुमान प्रा. मंडळ कशेळे, ओमसाई भजन मंडळ कोलीवली, माऊली प्रा. भजन मंडळ धोत्रे, जय हनुमान प्रा. भजन मंडळ उमरोली, छत्रपती प्रा. भजन मंडळ सावरगाव, मुक्ताई प्रा. भजन मंडळ कशेळे, जय हनुमान प्रा. भजन मंडळ असोरोटी, जय हनुमान प्रा. मंडळ तिघर, श्री सद्गुरू प्रा. भजन मंडळ चिंचवली शेकीन अशी मंडळे सहभागी झाली होती.

# खालापूर शहरातील वाहतूक कोंडीला कंटाळून ज्येष्ठ नागरिकाचे आंदोलन

**खालापूर, खोपोली : प्रतिनिधी**

खालापूर शहरातील वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी वर्षभरापासून पाठपुरावा करणारे हभप उदय घोलप यांनी मंगळवारी (दि.२३) शहरातील मुख्य रस्त्यावर अक्षरशः लोटांगण घालून आंदोलन केले.



उदय घोलप यांनी नगरपंचायतीला पत्र देऊन वाहतूक कोंडी प्रश्न सोडवावा अन्यथा उपोषण करू असा लेखी इशारा दिला होता, परंतु त्याकडे दुर्लक्ष होत असल्याने उदय घोलप त्यांची सहनशीलता संपली. मंगळवारी नातीला शाळेत सोडायला घेऊन जात असताना १० मिनिटे वाहतूक कोंडीत अडकल्याने रस्त्यात लोटांगण घेत आंदोलन केले. वाहतूक कोंडीचा प्रश्न मार्गी लागावा यासाठी सातत्याने पाठपुरावा करणाऱ्या इनरव्हील क्लबच्या माजी अध्यक्षा क्षमा आठवले त्या ठिकाणी उपस्थित होऊन त्यांनी खालापूरकरांची कैफियत मांडली. शहरातील मुख्य रस्त्यावर वाहतूक कोंडी झाल्यामुळे तातडीने खालापूर पोलीस नगरपंचायत अभियंता देवेंद्र मोरखंडीकर त्या ठिकाणी आले.

पोलिसांनी उदय घोलप यांची समजूत काढत अस्ताव्यस्त वाहनांवर दंडात्मक कारवाई करू, असे आश्वासन दिले. नगरपंचायतीने वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी नेमलेला कर्मचारी जागेवर नसल्याने ही समस्या उद्‌भवत असून कायमस्वरूपी तोडगा काढा, अशी मागणी उदय घोलप यांनी केली आहे.

## तळा ‘कोमसाप’तर्फे अभीष्टचिंतन व कविसंमेलन

**माणगाव : प्रतिनिधी**

कोकण मराठी साहित्य परिषद शाखा तळा यांच्या वतीने गुरुपौर्णिमेनिमित्त रविवारी (दि.२१) इंदापूर येथील तळा शाखेचे सदस्य रायगड भूषण ॲड.परेश जाधव यांच्या मातोश्री लक्ष्मी जाधव यांचा ८६वा अभिष्टचिंतन सोहळा व आई या विषयावर अनौपचारिक काव्यसंमेलन उत्साहात पार पडले.

दिपप्रज्वलन व ग्रंथपूजन करून लक्ष्मी जाधव यांची पाद्यपुजा आणि औक्षण करण्यात आले. संगीत शिक्षक अजित भोपी यांनी गुरुवंदना तर भरत जोशी यांनी गीतगायन करून प्रारंभ केला. त्यानंतर आईया विषयावर उल्का माडेकर, शिल्पा मोहिते, प्रणय इंगळे,बाबाजी धोत्रे, हेमंत बारटक्के, श्रीकांत खताळ, संदिप जामकर, पुनीत जाधव, परेश जाधव, डॉ. पुनम जाधव यांनी आपल्या स्वरचित कविता सादर करुन वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन केले. ॲड. परेश जाधव व अजित भोपी यांना तळा शाखेचे अधिकृत सदस्यत्व बहाल करून त्यांचे स्वागत केले.




## अल्पवयीन मुलीचे अपहरण, बलात्कारप्रकरणी आरोपीस सक्तमजुरी

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव पोलीस स्टेशनच्या हद्दीत अल्पवयीन मुलीचे अपहरण करून बलात्कार केल्याप्रकरणी आरोपीस सक्तमजुरीची शिक्षा माणगाव सत्र न्यायालयाने सुनावली आहे.

फिर्यादींनी त्यांच्या अल्पवयीन मुलीचे अपहरण झाल्याची तक्रार २१ जुलै २०१९ रोजी माणगाव पोलीस स्टेशन येथे दाखल केली. गुन्ह्याच्या तपासाअंती आरोपीने पीडित मुलीस त्याचे मूळ गावी जबलपूर, मध्य प्रदेश येथे पळवून नेले होते. आरोपीने तेथे इच्छेविरूद्ध शारीरिक संबंध ठेवल्याचे मुलीने पोलिसांना आपल्या जबाबामध्ये सांगितले. त्यावरून माणगाव पोलिसांनी गुन्हा दाखल केला. गुन्ह्याचा तपास महिला पोलीस उपनिरीक्षक पी.पी.बुरुंगळे यांनी करून दोषारोप पत्र जिल्हा सत्र न्यायालयात दाखल केले. खटल्याची सुनावणी माणगाव विशेष न्यायालय येथे झाली. खटल्यामध्ये योगेश तेंडुलकर अतिरिक्त शासकीय अभियोक्ता यांनी सरकार पक्षाच्या वतीने काम पाहिले.केसच्या सुनावणीदरम्यान पैरवी अधिकारी दिनेश आघाव, पोलीस निरीक्षक छाया कोपनर, शिशीकांत कासार सहा. फौजदार शिशिकांत गोविलकर, शिपाई सोमनाथ ढाकणे यांनी सहकार्य केले.

न्यायाधीश हर्षल भालेराव यांनी आरोपी नेताराम पुराणलाल चौधरी यास दोषी ठरवून सोमवारी (दि.२२) भादंविसं कलम ३७६(३) अन्वये २० वर्षे सक्त मजुरी व ५०,००० रुपये दंड, ३७६(२) एन अन्वये १० वर्षे सक्त मजुरी व ५०,००० रुपये, कलम ३६३ अन्वये पाच वर्षे सक्त मजुरी व २५,००० रुपये दंड व पोक्सो कलम ४ अन्वये २० वर्षे सक्त मजुरी व ५०,००० रुपये दंड व दंड न भरल्यास तीन महिने साधा करावास, पॉक्सो कलम ६ अन्वये २० वर्षे सक्तमजुरी व ५०,००० रुपये दंड व दंड न भरल्यास तीन महिने साध्या करावासाची शिक्षा ठोठावली.


**पाहिजेत संगणक प्रशिक्षक व हार्डवेअर इंजिनिअर**

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ साठी रयत शिक्षण संस्थेच्या रायगड विभागामधील माध्यमिक विभागातील शाखेमध्ये के आय आय टी, सातारा मार्फत खालील प्रमाणे पूर्णपणे हंगामी, कॉन्ट्रॅक्ट पद्धतीने, तात्पुरत्या स्वरुपाच्या व तात्पुरत्या कालावधीसाठी (सत्र नुसार) तासिका तत्वावरती (CHB) निवड करावयाची आहे.

१. **संगणक प्रशिक्षक** (Computer Lab Instructors) शै. पात्रता BE (CS/ IT) / MCA./ MCM/ M.Sc (CS/IT)/D.C.E/PGDCA/B.C.S / B.C.A./किंवा पदवीधर व १ वर्षे ६ महिने कालावधीचा शासनमान्य कॉम्प्युटर कोर्स.

२. **हार्डवेअर इंजिनिअर** – शै. पात्रताः MCSA किंवा पदवीधर व शासनमान्य १ वर्ष २ वर्ष कालावधीचा Hardware Engineering कोर्स. अनुभव असणा-यास प्राद्यान्य. विहित नमुन्यातील ऑनलाईन अर्ज व सविस्तर माहिती www.kiitsatara.blogspot.in या ब्लॉग वरती उपलब्ध आहे ऑनलाईन अर्ज भरण्याची अंतिम तारीख ३०/०७/२०२४ आहे. संपर्क- ०२१६२-२३६१५१ मुलाखत दिनांक ३१-०७-२०२४ ठिकाण :- न्यू इंग्लिश स्कूल, कामोठे (लोकनेते दि.बा.पाटील कामोठे), ऐश्वर्या हॉटेल जवळ

**मा. संचालक, के.आय.आय.टी., सातारा**


# खालापुरात मंदिरातील दानपेट्या चोरट्यांकडून लक्ष्य

**खोपोली : प्रतिनिधी**

तालुक्यातील मंदिरातील दानपेट्यावर चोरट्यांची नजर गेली असून रसायनी, खोपोलीनंतर खालापूर पोलीस ठाणे हद्दीतदेखील आपटी येथील मंदिरात चोरी झाली आहे.




रात्रीच्या सुमारास गावदेवी मंदीर आपटी येथील मंदिराच्या मुख्य दरवाजाचा कुलूप तोडून चोरट्यांनी मंदिराच्या आत प्रवेश करून मंदिरामधील दानपेटीला असलेले कुलूप तोडले. दानपेटीमधील एक हजार ५०० रुपये रोख रक्कम व मंदिराच्या गाभाऱ्यातील दोन पितळी समई व दोन पितळी पराती असे एकूण सहा हजार रुपये किमतीचा ऐवज चोरी केला. याबाबत खालापूर पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


**महाराष्ट्र शासन**

**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, सा.बां. विभाग, पनवेल**

**पिनकोड-४१०२०६**

E-mail- panvel.ee@mahapwd.gov.in

दूरध्वनी क्रमांक ०२२-२७४५२७७८ फॅक्स - ०२२-२७४६७४४०

**ई-कार्यप्रणाली अंतर्गत ई-निविदा क्र. १२ (ई-निविदा) सन २०२४-२५**

सार्वजनिक बांधकाम (सा.बां.) विभाग, पनवेल हे (दुरध्वनी क्र. ०२२-२७४५२७७८ फॅक्स-०२२-२७४६७४४०) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडील नोंदणीकृत कंत्राटदाराला योग्य त्या कामांकरीता बी-१ नमुन्यातील निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागविणेत येत आहे. सदरची ऑनलाईन ई-निविदा सूचना www.mahapwd.com and www.mahatenders.gov.in पोर्टलवरती उपलब्ध आहे.

टिप- या निविदेमध्ये एकूण १४ कामे समाविष्ट असून ऑनलाईन निविदा विक्री व बीड प्रिपरेशन दिनांक २२.०७.२०२४ सकाळी १०.०० ते दिनांक २९.०७.२०२४ रोजी सायंकाळी १८.०० पर्यंत संकेत स्थळावर उपलब्ध करुन देणेत आलेली आहे. www.mahatenders.gov.in

**ई-निविदा जा.क्र./सा.बां./पनवेल/**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**
**सा.बां. विभाग, पनवेल, जि. रायगड**
**दिनांक : २३/०७/२०२३**

**सही/-**
**कार्यकारी अभियंता,**
**सार्वजनिक बांधकाम विभाग,**
**पनवेल**



**नावात बदल**

माझे जुने नाव **श्री. सुमित सुनिल वाटावे,** (Sumit Sunil Vatave) राहणार घर नं. ३५४, बौध्दवाडी, पडम, ता. रोहा, जि. रायगड ४०२१०९. राज्य महाराष्ट्र हे माझे जुने नाव असून, माझ्या शालेय कागदपत्रांवर सुमित सुनिल वाटावे. असे नजरचुकीने झाले आहे. माझे खरे बरोबरचे नाव सुमित सुनिल वाटवे आहे. एकच व्यक्ती आहे. याबाबत मी महाराष्ट्र शासनाचे राजपत्र केले आहे नंबर M 24115102 **दि. १८/७/२०२४** रोजी बदलले असून, यापुढे मी **सुमित सुनिल वाटवे** (Sumit Sunil Watve ) या नवीन नावाने ओळखला जाईन.

**सही/-**
**सुमित सुनिल वाटवे**
(Sumit Sunil Watve )
नवीन नाव


# वडगाव शाळेत निघाली शिक्षणाची वारी

**चौक : प्रतिनिधी**

गुरुपौर्णिमा आणि आषाढी एकादशीनिमित्त राजिप शाळा वडगाव येथे वारी विठ्ठलाची, वारी शिक्षणाची कार्यक्रम मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला.



खालापूर तालुक्यातील रायगड जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा वडगाव येथे दप्तरमुक्त शाळा या उपक्रमांतर्गत वारी शिक्षणाची, वारी विठ्ठलाची हा उपक्रम राबविण्यात आला. प्रेस क्लब रायगडचे कार्याध्यक्ष प्रशांता गोपाळे यांनी मुलांना मार्गदर्शन करताना, याच वयात शरीर कमवा, शैक्षणिक उपक्रमात सहभाग घ्यावा असे आवाहन केले, तर शैक्षणिक उपक्रमास लागणारी आवश्यक मदत मी कायम देईन, असे महादेव गडगे यांनी सांगितले.

महाराष्ट्राचा सण, उत्सव, अंधश्रद्धा निर्मुलन, शिक्षणाचे महत्त्व विषद करण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन केले असे मुख्याध्यापक सुभाष राठोड यांनी सांगितले. यानंतर शाळेपासून गावात पायी दिंडीचे आयोजन करण्यात आले होते. यात विविध वेशभूषेतील विद्यार्थी सर्वांचे मन वेधून घेत होते. इयत्ता तिसरीचा निळकंठ दळवी हा विठ्ठल तर स्वराली घोरपडे ही रुखमाईच्या वेशभूषेत होते. या पायी वारीत प्रशांत गोपाळे, माजी सरपंच गडगे, पत्रकार काशिनाथ जाधव सुभाष राठोड यांच्या सह शिक्षक,पालक,ग्रामस्थ उपस्थित होते. या रिंगण सोहळयात अनेकांनी फेर धरला.

गावातून पायी निघालेल्या वारीतील पालखी, विठ्ठल रुख्मिनी व वारकऱ्यांची गावात पाय धुवून पूजा करीत अनेक गावकऱ्यांनी वारीचा आनंद घेतला.

हभप जनार्दन दळवी महाराज यांचे पखवाज वादन तर हभप रामदास महाराज दळवी यांचे भजन, त्यांना शिक्षक वैजनाथ जाधव व मयूर जाधव यांची साथ मिळाली. हातात असलेले शिक्षणाचे महत्त्व सांगणारे फलक, तंबाखू टाळण्याचे घोषवाक्य असलेले फलक, अंधश्रद्धा निर्मूलन आदी फलकांनी गावकऱ्यांचे लक्ष वेधून घेतले होते. महादेव गडगे व ग्रामस्थांकडून खाऊवाटप करण्यात आले.

## राष्ट्रवादी असंघटित कामगार जिल्हाध्यक्षपदी नंदकुमार म्हात्रे

**रोहे** : राष्ट्रवादी प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांच्या मान्यतेने असंघटित कामगार विभागाची राज्याची कार्यकारिणी जाहीर झाली असून या कार्यकारणीत रायगड जिल्हाध्यक्षपदी नंदकुमार म्हात्रे यांची निवड करण्यात आली आहे. नंदकुमार म्हात्रे यांनी याआधी जिल्हा परिषद सदस्य, राष्ट्रवादीचे उपाध्यक्षपदी काम केले आहे.



त्यांच्या निवडीनंतर त्यांचे खासदार सुनील तटकरे, मंत्री आदिती तटकरे, माजी आमदार अनिकेत तटकरे, असंघटित विभाग महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष मनोज व्यवहारे, प्रदेश सरचिटणीस विजयराव मोरे, रायगड जिल्हाध्यक्ष मधुकर पाटील, जिल्हा सरचिटणीस सुरेश मगर, तालुकाध्यक्ष विनोद पाशिलकर, युवा नेते नवनीत डोलकर आदींनी अभिनंदन केले.


**महाराष्ट्र शासन, गृह विभाग (बंदरे व परिवहन)**

**महाराष्ट्र सागरी मंडळ**

इंडियन मर्कन्टाईल चेंबर्स , दुसरा मजला, १४ रामजीभाई कमानी मार्ग, बेलार्ड इस्टेट, मुंबई- ४०० ००१.

दूरध्वनी क्र. ०२२-६९०४१७७७ फॅक्स क्र. ०२२-६९०४१७४०

Website: https://mahammb maharashtra.gov.in

Email: ceo.mmb@maharashtra.gov.in/ceommb @ gmail.com

**द्वितीय ई - निविदा सूचना (सन २०२४-२५)**

Main Portal: https://mahatenders.gov.in

मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र सागरी मंडळ, मुंबई हे महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागातील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत व योग्य अनुभव असलेल्या ठेकेदाराकडून खाली नमूद केलेल्या कामासाठी बी- १ नमुन्यात ई-निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | कामाच्या निविदेची अंदाजित किंमत (रु.) | इसारा रक्कम (रु.) | को-या निविदेची किंमत (रु.) | काम पूर्ण करण्याचा कालावधी (महिन्यात) |
|---|---|---|---|---|---|
| १ | मांडवा, ता. अलिबाग जि. रायगड येथील रो-रो जेट्टीला बसविण्यात आलेल्या लिंक स्पॅन पॉन्टुनची वार्षिक देखभाल दुरूस्ती करणे. | १,०७,५१,५४०/- | १,०८,०००/- | १,१८०/- | १२ महिने (पावसाळा कालावधी धरून) |

तपशिलवार अटी व शर्ती पाहण्यासाठी तसेच कोरा निविदा फॉर्म डाऊनलोड करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या ई-निविदा पोर्टल https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक **२४.०७.२०२४ रोजी १७:००** वा. पासुन ते दिनांक **०७.०८.२०२४ रोजी १७.००** पर्यंत उपलब्ध असतील.

कोणतीही निविदा किंवा सर्व निविदा कारण न दर्शविता नाकारण्याचा अधिकार निम्न स्वाक्षरीकार यांचेकडे राखून ठेवण्यात आला आहे.

**सही/-**
**(सुधीर देवरे)**
**कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र सागरी मंडळ, मुंबई.**



आज़ादी का अमृत महोत्सव | G20

**केन्द्रीय विद्यालय ए.ए.डी. करंजा**

(शिक्षा मंत्रालय भारत सरकार के अधीन स्वायत्त निकाय)

पता -नौसेना आयुध भंडार, करंजा उरण रायगढ़ महाराष्ट-४००७०४

**KENDRIYA VIDYALAYA N.A.D. KARANJA**

(An Autonomous Body under Ministry of Education, Govt. of India)

Address: Naval Armament Depot, Karanja, Uran, Raigad (MH)-४००७०४

दूरभाष/फॅक्स-022-27222132, ई-मेल-kvkaranja@gmail.com,

CBSE Aff.1100017 UDISE: 27241501112 Web Site: https://nadkaranja.kvs.ac.in

वैबसाइट - https://nadkaranja.kvs.ac.in | ईमेल: kvkaranja@gmail.com

**साक्षात्कार सूचना /Walk-In Interview**
**URGENTLY REQUIRED**

केंद्रीय विद्यालय एन.ए.डी करंजा में शैक्षिक वर्ष २०२४-२५ हेतु पूर्ण रूप से संविदा के आधार पर (on Purely Contractual Basis) शैक्षिक एवं अन्य पदों के लिए साक्षात्कार आयोजित किया जा रहा है -

| पद का नाम | न्यूनतम योग्यता |
|---|---|
| **स्नातकोत्तर शिक्षक** (Post Graduate Teachers) **(अंग्रेजी,अर्थशास्त्र, गणित, भूगोल)** | किसी मान्यता प्राप्त विश्वविद्यालय से संबन्धित विषय में ५०% अंकों के साथ स्नातकोत्तर डिग्री (एम.ए/एम.एस.सी) एवं बी.एड डिग्री |

**साक्षात्कार दिवस :** 31.07.2024 **(बुधवार)**
**पंजीकरण समय :** 8:00 AM TO 10:00 AM

**नोट :** अधिक जानकारी हेतु विद्यालय की वेबसाइट देखें। आवेदन प्रपत्र / बायोडाटा फॉर्म विद्यालय की वेबसाइट http://nadkaranja.kvs.ac.in से डाउनलोड कर सकते हैं। साक्षात्कार में भाग लेने वाले अभ्यर्थी को किसी तरह का यात्रा भत्ता नहीं दिया जाएगा। साक्षात्कार के दौरान अपने साथ तीन पासपोर्ट आकार की फोटो, मूल दस्तावेज एवं सभी दस्तावेजों की एक एक प्रतिलिपि अवश्य लायें।

**सही/-**
**प्राचार्य**
**केवि एन. एडी करंजा**
**प्राचाय/Principal**
**केंन्द्रीय विद्यालय/Kendriya Vidyalaya**
**एन.ए.डी. करंजा / N-D Karanja**
**जिला-रायगढ़ (महाराष्ट्र)/Dist.-Raigad (MH.)**

# निवडक

## ठाकरे गटातील कार्यकर्ते शिवसेनेत



**नवी मुंबई** : शिवसेना बेलापूर विभाग प्रमुख प्रकाश आमटे यांच्या पुढाकाराने सानपाडा आणि जुईनगर येथील ठाकरे गटातील विभागप्रमुख यशवंत कांबळे, जुईनगर येथील युवा विभाग संघटक वैभव खरात, शाखा प्रमुख रवी पवार यांसह कार्यकर्त्यांनी उपनेते विजय नाहटा यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेऊन सानपाडा येथे एका कार्यकमात शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. उपनेते विजय नाहटा यांनी सर्वांचे शिवसेना पक्षात स्वागत करीत आपण जनतेची काम करीत रहा, आपणांस निश्चित सहकार्य मिळेल, असे आश्वासन या वेळी दिले. शहर प्रमुख विजय माने, मिलिंद सूर्यराव आदी उपस्थित होते.

## अरुण जाधव यांना पर्यावरण पुरस्कार



**मोहोपाडा** : रसायनी येथील पर्यावरणप्रेमी अरुण गोविंद जाधव हे पर्यावरण संवर्धन व पाताळगंगा नदी संवर्धन ट्रस्टच्या माध्यमातून काम करीत आहेत. त्यांच्या कार्याचा गौरव गुरुपोर्णिमेनिमित्त इंटरनॅशनल इन्व्हार्मेंट मल्टिपर्पज ह्युमन सर्व्हिस ऑर्गनायझेशन इंडिया आयोजित राष्ट्रीय एकात्मता गौरव संमेलनात अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाचे अध्यक्ष मेघराज राजेभोसले, चित्रपट अभिनेते झाकिर खान, अभिनेता मिलिंद गवळी यांच्या हस्ते महाराष्ट्र पर्यावरण सेवा मित्र पुरस्काराने करण्यात आला. अरुण जाधव यांनी खालापुरात पाच हजार वृक्ष लागवड केली आहे. प्लास्टिक बंदी जनजागृती म्हणून या वर्षी २० हजार कापडी बॅग वाटप करण्यात आले. त्यांना पुरस्कार मिळाल्याने त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## गुरूपौर्णिमानिमित्त मातृ-पितृ गुरूपूजन



**नवी मुंबई** : गुरुपौर्णिमेनिमित्त मातृ-पितृ गुरुपूजन सोहळ्याचे नूतन विद्यालयात आयोजन केले होते. दोन्ही सत्रातील विद्यार्थ्यांनी गुरुपूजन करून मातृ-पितृपूजन केले. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे वक्ते कवी लेखक नारायण वसंतराव लांडगे पाटील यांचे गुरुवंदना या विषयावर व्याख्यान झाले. कला शिक्षक श्रीहरी पवळे यांचे फलक लेखन लक्ष वेधून घेत होते. कार्यक्रमात शाळेच्या मुख्याध्यापिका रेश्मा सय्यद, पर्यवेक्षक संतोष कदम, कला शिक्षक श्रीहरी पवळे, पालक प्रतिनिधी आणि सर्व शिक्षक उपस्थित होते. या कार्यक्रमाचे नियोजन विद्यार्थ्यांनीच केल्यामुळे सूत्रसंचालन, प्रमुख पाहुणे परिचय, आभार विद्यार्थ्यांनीच केले.

# गरजेपोटी बांधलेली बांधकामे नियमित करा

- आमदार गणेश नाईक यांची आक्रमक भूमिका
- जनसंवाद उपक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद

**नवी मुंबई : बातमीदार**



आमदार गणेश नाईक यांचा सोमवारी (दि.२२) ऐरोली येथील भाजप जनसंपर्क कार्यालयात जनसंवाद उपक्रम पार पडला. त्याला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या वेळी आमदार गणेश नाईक यांनी नवी मुंबईमध्ये गरजेपोटी बांधलेली सर्व प्रकारची बांधकामे नियमित करण्याची तसेच झोपडपट्ट्यांचा विकास शासनाच्या माध्यमातून करण्याची मागणी केली.

जनसंवाद उपक्रमात मोठ्या संख्येने नागरिकांनी निवेदने दिली. यापैकी अनेक निवेदनांवर तत्काळ कार्यवाही करीत नागरिकांना दिलासा देण्यात आला. उर्वरित निवेदनांवर कालबद्ध पद्धतीने कार्यवाही करण्यात येणार आहे. गाव, गावठाण, शहर, झोपडपट्टी परिसर, औद्योगिक परिसर, एलआयजी, एमआयजी, सोसायट्या सर्वच भागातील नागरिकांनी आपल्या समस्या आणि अडचणी मांडल्या. पाणीपुरवठा, वीजपुरवठा, आरोग्य, शिक्षण आदी समस्यांच्या निवेदनांचा निपटारा करण्यात आला.

आमदार गणेश नाईक यांनी, नवी मुंबईमध्ये गरजेपोटी बांधलेली सर्व प्रकारची बांधकामे नियमित करण्याची तसेच झोपडपट्ट्यांचा विकास शासनाच्या माध्यमातून करण्याची मागणी केली. नवी मुंबईची निर्मिती करण्यासाठी येथील प्रकल्पग्रस्तांनी आणि स्थानिकांनी कवडीमोल भावात त्यांच्या जमिनी सिडकोला दिल्या.

नियमानुसार गावठाण विस्तार योजना सिडकोने राबवली नाही. साडेबारा टक्क्यांची योजना पूर्ण केली नाही. काळाच्या ओघात कुटुंबाचा विस्तार झाल्यामुळे प्रकल्पग्रस्तांनी राहण्यासाठी घरे आणि उदरनिर्वाहासाठी वाणिज्य बांधकामे केली. आजपर्यंतची अशा प्रकारची सर्व बांधकामे नियमित करावी. प्रकल्पग्रस्तांना घरांचा आणि त्या खालील जमिनीचा मालकी हक्क द्यावा. प्रकल्पग्रस्तांच्या हिताची त्यांना पाहिजे, तशी योजना जाहीर करण्याची मागणी केली.

नवी मुंबईतील झोपडपट्ट्यांमधून राहणाऱ्या नागरिकांचे जीवनमान उंचावण्यासाठी त्यांना हक्काचे आणि पक्के घर मिळण्यासाठी झोपडपट्ट्यांचा विकास झालाच पाहिजे, या मताचे आम्ही आहोत. नवी मुंबईतील झोपडपट्टीवासियांना त्यांच्या घरांची आणि त्याखालील जमिनीची मालकी द्यावी. शासनाने स्वतः म्हाडाच्या धर्तीवर झोपडपट्ट्यांचा विकास करावा, अशी मागणी त्यांनी केली. योजनेतील पात्र, अपात्रतेबाबत स्पष्टता हवी. सोयीसुविधांबाबत शहरांमधील संतुलनही राहिले पाहिजे, असेही त्यांनी नमूद केले.

## नेरूळ बसथांबा झाला व्यवस्थित




### माजी नगरसेविका रूपाली भगत यांचा पाठपुरावा

**नवी मुंबई : बातमीदार**

महापालिका प्रभाग ९६मधील नेरूळ सेक्टर १६मधील दूरवस्था झालेल्या बसथांब्याची दुरूस्ती, आसनव्यवस्थेची डागडुजी भाजपच्या स्थानिक माजी नगरसेविका रुपाली भगत यांच्या पाठपुराव्यामुळे झाली आहे.

नेरूळ सेक्टर १६मधील बसथांब्याची आसनव्यवस्था पूर्णपणे तुटलेली होती. स्टीलची आसनव्यवस्था तुटल्याने व निखळून पडल्याने दोन्ही आसनव्यवस्थेवर कुठे लाकडी फळ्या तर कुठे तुटलेली रिक्त बाकडे असेच चित्र होते. यामुळे प्रवाशांना बसण्यासाठी आसनाची सोय नव्हती. प्रवाशांची होत असलेली गैरसोय टाळण्यासाठी भाजपच्या माजी नगरसेविका रुपाली भगत यांनी पालिका प्रशासनाकडे सातत्याने लेखी निवेदनातून पाठपुरावा केला.

महापालिका प्रशासनाकडून मंगळवारी (दि.२३) सकाळी या बसथांब्यावरील आसनव्यवस्थेची दुरूस्ती करून नव्याने स्टीलचे दोन बाकडे त्या ठिकाणी बसविण्यात आले आहेत. त्या वेळी भाजपचे पदाधिकारी रवी भगत व कार्यकर्ते उपस्थित होते.

## नेरूळ, जुईनगर येथील अतिक्रमणे मनपाने हटविली

**नवी मुंबई** : सानपाडा, जुईनगर विभागातील होल्डिंग पॉण्ड नष्ट करून वेगवेगळ्या प्रकारची अनधिकृत गोदामे उभारण्यात आली होती. पहिल्याच पावसाळ्यात सानपाडा, जुईनगर विभागात पाणी शिरल्यानंतर नवी मुंबई महानगरपालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांना सानपाडा जुईनगर विभागातील होल्डिंग पॉईंट नष्ट झाल्यामुळे शहरात पाणी शिरल्याचे लक्षात येताच, त्यांनी तत्काळ अतिक्रमण विभागाला कारवाईचे आदेश दिले.

आयुक्तांच्या आदेशानुसार जुईनगर रेल्वे कॉलनी समोरील होल्डिंग पाँड येथे उभारण्यात आलेल्या अनधिकृत गोदामांवर पालिकेच्या अतिक्रमण विभागाने हातोडा लावून सर्व भुईसपाट केले.

## वादळी वाऱ्यामुळे उरण सागरी मार्गावरील जलसेवा खंडित

**उरण : रामप्रहर वृत्त**

मागील तीन दिवसांपासून सुरू असलेल्या सोसाट्याच्या वादळी वाऱ्यामुळे समुद्र खवळलेला आहे. त्यामुळे खबरदारी म्हणून उरणला जोडणाऱ्या मोरा-मुंबई, करंजा-रेवस, जेएनपीटी -भाऊचा धक्का आदी जलमार्गावरील वाहतूक बंद करण्यात आली आहे. खराब हवामानामुळे विभागाने बंदरात धोक्याचा इशारा देणारा तीन नंबरचा बावटा लावण्यात आला आहे.

परिणामी गेटवे-एलिफंटा, गेटवे-जेएनपीए, मोरा-भाऊचा धक्का, करंजा-रेवस या मार्गावरील सागरी प्रवासी वाहतूक बंद करण्यात आली आहे. मुसळधार पावसाचा फटका येथील सागरी प्रवासी वाहतुकीलाही मोठ्या प्रमाणावर बसला आहे. त्यामुळे खबरदारीची उपाययोजना म्हणून गेटवे ऑफ इंडिया-एलिफंटा दरम्यानची सागरी प्रवासी वाहतूक बंद करण्यात आली असल्याची माहिती मोरा बंदर विभागाचे निरीक्षक नितीन कोळी यांनी दिली. धोक्याच्या इशाऱ्यानंतर या सागरी मार्गावरील प्रवासी, पर्यटक वाहतूक कोलमडली आहे.



यामुळे विविध सागरी मार्गावरील पर्यटक, प्रवासी सेवा खंडित झाल्याने या सागरी मार्गावरून दररोज प्रवास करणाऱ्या हजारो प्रवासी, पर्यटकांची गैरसोय होत आहे.

## सत्कार



**पनवेल : गुरुपौर्णिमेचे औचित्य साधून संजय पाटील यांची न्यू पनवेल रोटरी क्लबचे अध्यक्षपदी नियुक्ती झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. या वेळी मॉर्निंग योगा ग्रुप, केबीसी, एसबीएसई, आणि एसीएफके व आनंदी ग्रुपचे पदाधिकारी उपस्थित होते. संजय पाटील यांनी आभार मानून सर्वांनी दिलेल्या शुभेच्छांचा स्वीकार केला.**

## खारघरच्या रामशेठ ठाकूर महाविद्यालयात रक्तदान शिबिर



**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व जसलोक हॉस्पिटल मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवारी (दि.२३) बेलापूर येथील रेल्वे स्टेशनवर रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. शिबिरासाठी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंसेवकांनी बेलापूर येथील रेल्वे स्टेशनवर जाऊन तेथील प्रवाशांना रक्तदानाचे महत्त्व पटवून दिले.

शिबिरात २०० ते २५० प्रवाशांनी रक्तदान केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांनी सर्व स्वयंसेवकांचे अभिनंदन केले. या उपक्रमाचे आयोजन प्रा. प्रथमेश ठाकूर यांनी केले तसेच प्रा. राहुल कांबळे, प्रा. डॉ. महादेव चव्हाण, प्रा. मनोज यादव, प्रा. नीलम मोरे व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

## युईएस प्री-स्कूलमध्ये आजी-आजोबा दिन उत्साहात

**उरण : रामप्रहर वृत्त**

युईएस लिटिल सिड्स इंटरनॅशनल प्री-स्कूलमध्ये गुरुपौर्णिमा आणि फाऊंडेशन डेनिमित्त सोमवारी (दि.२२) आजी-आजोबा साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून निवृत्त असिस्टंट सब इन्स्पेक्टर अशोक रघुनाथ निलवर्ण लाभले होते. त्यांच्यासोबत व्यासपीठावर युईएस स्कूल अ‍ॅण्ड ज्युनियर कॉलेजच्या प्राचार्य सिमरन दहिया, माध्यमिक, प्राथमिक व पूर्व-प्राथमिक विभागातील पर्यवेक्षिका, समन्वयक तसेच आजी-आजोबा, त्यांची नातवंडे उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात सर्व मान्यवरांच्या हस्ते सरस्वती व प्रधान मॅडम यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून व दीपप्रज्वलन करून झाली. त्यानंतर प्रमुख पाहुण्यांना भेट म्हणून पुष्पगुच्छ, शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन गौरवण्यात आले. प्रमुख पाहुणे अशोक निलवर्ण यांनी, शाळेबद्दल गौरवोद्गार काढले. त्यानंतर पूर्व प्राथमिक विभागाच्या शिक्षिकेने आजी-आजोबांचे आपल्या आयुष्यातील महत्त्व स्पष्ट करून त्यांच्याविषयी आदर व्यक्त केला. उपस्थितांमधून



काही आजोबांनी व आजींनीही आपले मनोगत व्यक्त करून असा कार्यक्रम आयोजित केल्याबद्दल संपूर्ण युईएस परिवाराचे आभार मानले. एका विद्यार्थ्याने स्तोत्र म्हणून सर्वांची मने जिंकली.

पूर्व-प्राथमिक विभागाच्या पर्यवेक्षिका रेश्मा वैद्य यांच्या सुत्रसंचलनाखाली आजी-आजोबांसाठी मनोरंजक खेळाचे आयोजन करण्यात आले होते. त्यानंतर खेळात विजयी झालेल्यांना बक्षिस देऊन गौरविण्यात आले व सर्व आजी-आजोबांना भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात आले.



## बीसीटी लॉ कॉलेजमध्ये आंतरराष्ट्रीय न्याय दिन साजरा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आंतरराष्ट्रीय कायदेशास्त्रिक न्यायाच्या आणि विचारशीलतेच्या विकासासाठी, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील भागुबाई चांगू ठाकूर (बीसीटी) विधी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय दिन उत्सव समितीने आंतरराष्ट्रीय न्याय दिवसानिमित्त विशेष कार्यक्रम आयोजित केला. कार्यक्रमाचे आयोजन समितीचे समन्वयक सहाय्यक प्रा. संग्राम पवार यांनी प्राचार्य सानवी देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली केले.

प्राचार्य सानवी सानवी देशमुख यांनी विद्यार्थ्यांना न्याय दिनाचे महत्त्व समजावून सांगितले. त्यांनी आंतरराष्ट्रीय न्यायदिनाच्या इतिहासावर प्रकाश टाकला. १७ जुलै १९९८ला रोम स्टॅच्यूटच्या मालिकेचा स्वीकृती केला गेला होता. युनायटेड नेशन्स, इंटरनॅशनल कोर्ट ऑफ जस्टिस आणि युनाइटेड डिक्लरेशन ऑफ ह्यूमन राईट्स याबाबत त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हुमांशु मेशाराम यांनी केले. मृणाल पाटेकर हिने आभार प्रदर्शन करताना जेबीएसपी संस्थेचे अध्यक्ष लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे सतत सहकार्य व मार्गदर्शक म्हणून कृतज्ञता व्यक्त केली.

## भारतीय मजदूर संघाचा स्थापना दिन उत्साहात





**उरण : रामप्रहर वृत्त**

भारतीय मजदूर संघाचा स्थापना दिवस जेएनपीए टाऊनशीपमध्ये उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त कामगार स्नेहमेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. समारंभाचे अध्यक्ष म्हणून कामगार नेते तथा भारतीय मजदूर संघाचे जिल्हाध्यक्ष सुरेश पाटील, प्रमुख वक्ते बाळासाहेब भुजबळ, बीएमएस महाराष्ट्र प्रदेश संघटन मंत्री तथा कामगार नेते सुधीर घरत, जेएनपीटीचे कामगार विश्वस्त रवींद्र पाटील यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली.

प्रमुख वक्ते बाळासाहेब भुजबळ यांनी, भारतीय मजदूर संघाची सविस्तर माहिती देत, आपण सारेजण फक्त देशहितासाठी काम करीत असून इथे 'मी'पणाला जागा नाही, असे विचार व्यक्त केले. कामगार नेते सुरेश पाटील यांनी, पुढील वर्षे हे ७०वे असून वर्षभर विविध समाजोपयोगी कार्यक्रम घेणार असल्याचे सांगितले. या वेळी अनिल चिर्लेकर, प्रमोद पाटील, नूरा शेख, डी.पी. सोनावणे, रवी नाईक, लंकेश म्हात्रे उपस्थित होते.

**जगभरातील कामगार संघटना भारतीय मजदूर संघाचे मार्गदर्शन घेत आहेत. राष्ट्र सर्वतोपरी या ब्रीदवाक्याने जागतिक कामगार विश्व प्रभावित आहे. देशहित नजरेसमोरे ठेवून काम करणारी एकमेव कामगार संघटना म्हणजे भारतीय मजदूर संघ आज जगातील कामगार संघटनांची विश्वगुरू झाली आहे.**
**-सुधीर घरत**, कामगार नेते

**जेएनपीटीमध्ये ठेकेदारी पद्धतीने काम करणाऱ्या कामगारांना त्यांची ग्रॅज्युईटी मिळवून देणार असून त्यासाठी विश्वस्त मंडळाच्या बोर्डात ठराव मंजूर करून घेण्यात येईल.**
**-रवींद्र पाटील**, कामगार विश्वस्त

## उरण येथे वृक्षारोपण कार्यक्रम



**उरण : रामप्रहर वृत्त**

कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने प्राचार्य के.ए. शामा यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून उरण रेल्वे स्टेशन, भाग्यलक्ष्मी हरितक्रांती संघ व मोरा पोलीस उपनिरीक्षक नागनाथ कुठार यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन केले गेले.

एक झाड आईसाठी या उपक्रमांतर्गत महाविद्यालयाच्या वतीने उरण रेल्वे स्टेशन परिसरात वृक्षारोपण कार्यक्रम आयोजित केला गेला. महाविद्यालयाचे प्राचार्य के. ए. शामा, उरण वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र कोते, रेल्वे स्टेशन मॅनेजर जगदीश जाधव यांनी शाश्वत विकासाबरोबर पर्यावरण रक्षण काळाची गरज असल्याचे सांगितले.

मोरा सागरी वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनील शिंदे, रेल्वे स्टेशन सब इन्स्पेक्टर बबलू कुमार, अक्षय कृषी केंद्राचे ज्ञानेश पाटील, वनक्षेत्र अधिकारी दिविलकर, माजी विद्यार्थी संघ अध्यक्ष विशाल पाटेकर, प्रा.व्ही.एस. इंदुलकर, डॉ.ए.आर. चव्हाण, शिक्षक आणि विद्यार्थी उपस्थित होते. सुमारे ५०० रोपांची लागवड करण्यात आली.

# खालापुरात वाढत्या नागरी समस्या

## जागरूक नागरिक नगरपंचायत दारी

**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**

खालापूर नगरपंचायत हद्दीत वाढत्या नागरी समस्यांमुळे जागरूक नागरिकांनी नगरपंचायत कार्यालय गाठत समस्यांचा पाढा वाचला. कारभारात सुधारणा करा, अन्यथा उग्र आंदोलन करू, असा इशारा या वेळी नागरिकांनी अधिकारीवर्गाला दिला.

खालापूर नगरपंचायत हद्दीत कचरा संकलन, पाणी, वाहनतळासह विविध समस्याची जंत्री आहे. कोणताही मार्ग निघत नसल्याने प्रत्येक प्रभागातील जागरूक नागरिकांनी सोमवारी एकत्र येत जाब विचारला. खालापूर नगरपंचायती हद्दीत सातत्याने अनियमित पाणीपुरवठा, चार-चार दिवस कचरा संकलन ठप्प, शहरातील मुख्य रस्त्यावर कायम वाहनांमुळे होणारी वाहतूक कोंडी, महड तीर्थक्षेत्री पाणी प्रश्न यासारख्या एकूण १७ समस्यांचे लेखी पत्र नागरिकांनी नगरपंचायतीला दिले. खालापूर नगरपंचायत मुख्याधिकारी रश्मी चव्हाण, नगराध्यक्ष रोशना मोडवे, उपनगराध्यक्ष संतोष जंगम, पाणीपुरवठा सभापती किशोर पवार, नगर अभियंता देवेंद्र मोरखंडीकर यांच्यासमोर नागरिकांनी समस्या मांडत खुलासा मागितला. या वेळी नागरिकांच्या प्रत्येक मुद्द्यांवर चर्चा करण्यात आली. सफाई कामगारांच्या सुरू असलेल्या संपाबाबत लवकरच तोडगा काढण्यात येईल, असे आश्वासन नगरपंचायतीमार्फत देण्यात आले. घनकचऱ्यासाठी शासनाकडून येणारा निधी बंद झाल्याने कचरा संकलन समस्या वारंवार डोकं वर करत असल्याची माहिती या वेळी नगरपंचायतीने दिली. नगरपंचायत हद्दीतील नागरिकांची समिती गठीत करण्यात यावी. जेणेकरून नगरपंचायत आणि नागरिक यांच्यात समन्वय राहील, अशी मागणी उपस्थितांकडून करण्यात आली.



या वेळी नागरिक दीपक बोंदार्डे, मंदा भोसले, क्षमा आठवले, विद्यमान नगरसेवक राजेश पारठे, नगरसेविका सुप्रिया साळुंखे, नगरपंचायतीचे माजी नगरसेवक अवधूत भुर्के, मनसेचे कार्यकर्ते विजय सावंत, नितीन पाटील, उमेश पडवकर, संभाजी पाटील, सचिन कळमकर, दत्ता चाळके, प्रतिक लोखंडे, भाजपाचे दीपक जगताप, संजय वाडेकर, अजिंक्य जोशी, बबन चव्हाण, राजेश बोंदार्डे तसेच प्रत्येक प्रभागातील नागरिक उपस्थित होते.

**अनेक भागात नागरिकांच्या सर्व समस्यांवर नगरपंचायतीकडून लेखी उत्तर मागितले असून केवळ तोंडी आश्वासनावर भागणार नाही. विकासकामे करताना राहिलेल्या त्रुटींमुळे अनेक ठिकाणी पाणी तुंबण्याचे प्रकार घडत आहे. नगरपंचायतीने कारभारात शिस्त आणि सुसूत्रता यावी यासाठी नागरिक एकत्र आले आहेत.**

**-विजय सावंत, मनसे तालुकाध्यक्ष, खालापूर**

**घनकचरासाठी येणारा निधी बंद झाल्याने स्वच्छतेच्या समस्या उद्भवत आहेत. याबाबत आमदार महेंद्र थोरवे यांच्याकडे पाठपुरावा करून निधीची तरतूद करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.**

**-रोशना मोडवे, नगराध्यक्ष, नगरपंचायत**

**नगरपंचायतीची पाणीसमस्या येत्या दोन महिन्यांत नवीन जलवाहिनी टाकल्यानंतर सुटणार आहे. ठेकेदाराला जरी मार्च २०२५पर्यंत मुदत असली, तरी त्यांनी काम तातडीने करावे याकडे लक्ष देण्यात येईल.**

**-देवेंद्र मोरखंडीकर, नगर अभियंता**

# सुधागडातील शाळांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्यातील आदिवासी व इतर समाजाच्या गरजू विद्यार्थ्यांना द लाइफ फाउंडेशन संस्था मुंबईच्या वतीने शैक्षणिक साहित्य देण्यात आले. साहित्य वाटनाचा कार्यक्रम पाली नं. १ शाळेत झाला.

कार्यक्रमासाठी सुधागड तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी साधुराम बांगारे याबरोबरच लाईफ फाउंडेशनचे विनोद सर, शिलाणंद सर व त्यांचे सहकारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राणे सर यांनी केले. या वेळी केंद्रप्रमुख कल्पना पाटील, खरात मॅडम, मोरेश्वर कांबळे, थळे सर, कैलास म्हात्रे, आनंद पाटील, मुख्याध्यापक बैकर सर, मोकल मॅडम, संदीप म्हात्रे, रोशन तांडेल आदी उपस्थित होते.



# प्रशासकीय कामाचा गोंधळ आणि विद्यार्थ्यांना मनस्ताप

**खोपोली : प्रतिनिधी**

हवामान खात्याने रायगड जिल्ह्यातील माणगाव, महाड, पोलादपूर व कर्जत या तालुक्यांना रेड अलर्ट दिल्याने शाळांना सुट्टी घोषित करण्याचे पत्रक जिल्हाधिकारी कार्यालयातून काढण्यात आले यात खालापूर तालुक्याला वगळण्यात आले, मात्र सोमवारी खालापूरसह खोपोली शहरात तुफान पावसाने सर्वत्र पाणी झाले व त्यामुळे भीतीचे वातावरण झाले होते, दरम्यान शाळा व्यवस्थापनाने परिस्थिती पाहता दुपानंतर विद्यार्थ्यांना सोडून दिले.


यानंतर मात्र विद्यार्थ्यांची घरी जाण्यासाठी तारांबळ उडाली. खोपोली-पेण मार्गावरील बसेसची संख्या कमी पाहता खोपोली बसस्टँडवर तुफान गर्दी झाली होती. सुमारे दोन तासानंतर आलेले बस पकडण्यासाठी मात्र विद्यार्थ्यांसह नागरिकांची एकच गर्दी झाली.

रायगड जिल्ह्यात इतर तालुक्यांना सुट्टी डिक्लेअर केले असताना खालापूर तालुका का वगळण्यात आला? अशी चर्चा विद्यार्थ्यांमध्ये व नागरिकांमध्ये रंगली. प्रशासकीय कामाचा गोंधळाचा कशा प्रकारे विद्यार्थ्यांना मनस्ताप झाला त्याचे चित्र पहावयास मिळाले.

# पालीच्या अंबा नदी पुलावर वाहतूक होतेय ठप्प; अनेकांना फटका

**सुधागड : रामप्रहर वृत्त**

मुसळधार पावसामुळे येथील वाकण-पाली राज्यमहामार्गावर पाली अंबा नदी पुलावर पाणी भरते आणि दोन्ही बाजूची वाहतूक ठप्प होते. अशावेळी येथील कामासाठी निघालेले चाकरमानी, प्रवासी तसेच विद्यार्थ्यांचे मोठे नुकसान होत असते.





मागील आठवड्यातदेखील येथे दोन्ही बाजूला वाहनांच्या लांब रांगा लागल्या होत्या. तब्बल सहा तास वाहतूक खोळंबली होती. वाकण-पाली-खोपोली राज्य महामार्गाच्या रुंदीकरणाचे काम नुकतेच पूर्ण करण्यात आले आहे. पाली व जांभूळपाडा अंबा नदी आणि भालगूल येथे मोठे पूल बांधण्यात आले तसेच पाली अंबा नदीवरील एक पूल पूर्ण झाला आहे, तर दुसऱ्या पुलाचे काम सुरू आहे. रस्ता रुंदीकरण व पुलामुळे पावसाळ्यात हा मार्ग सोयीचा व सुखकारक होईल, अशी अपेक्षा सर्वांना होती, मात्र पावसाळ्यामध्ये सर्वांचा हिरमोड झाला आहे.

पाली अंबा नदी पुलाच्या दोन्ही बाजूला रस्त्यावर पाणी साचून रस्ता बंद होतो. मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी होत असल्यामुळे प्रवासी नागरिक प्रचंड हैराण झाले आहेत. वाकण-पाली-खोपोली राज्य महामार्ग मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाला जोडतो तसेच दक्षिण कोकणातून मुंबई-पुणे द्रुतगती मार्गाने जाणारे प्रवासी याच मार्गावरून जातात. हा मार्ग सुस्थितीत असल्यामुळे अनेक प्रवासी व वाहने याच रस्त्याचा वापर करतात, मात्र पाली अंबा नदी पूल झाला असूनही पुलाच्या दोन्ही बाजूला पाणी साचल्यामुळे प्रवासी दोन्ही बाजूस अडकून पडतात व त्यांची गैरसोय होत असते.

**पूल जोडणाऱ्या वाकणकडे जाणाऱ्या रस्त्यावर हेवी इलेक्ट्रिकल लाईन असल्याने तो रस्ता उंच करणे शक्य झाले नव्हते. ही इलेक्ट्रिकल लाईन वर करून किंवा दुसरीकडे शिफ्ट करून मगच हा रस्ता उंच करण्याचे काम करता येईल. पालीकडे जाणाऱ्या रस्त्यावर पाणीपुरवठा करणारी जलवाहिनी आहे. काही दिवसांनी ही पाईपलाईन स्थलांतरित करून तेथील रस्ता उंच केला जाईल. शिवाय नदीपात्राव्यतिरिक्त पाणी बाजूने येत आहे. त्याबाबतही उपाययोजना करण्यात येतील.**

**-सचिन निफाडे, उपअभियंता, एमएसआरडीसी**

# माणगाव टीएमसी कॉलेजमध्ये करिअर संसदेची स्थापना

**माणगाव : प्रतिनिधी**

येथील जे. बी. सावंत एज्युकेशन सोसायटीच्या टीकमभाई मेथा कॉमर्स (टीएमसी) कॉलेजमध्ये करिअर कट्टा या शासनाच्या उपक्रमांतर्गत करिअर संसदेची स्थापना करण्यात आली. यानंतर करीअर संसदेच्या सर्व पदाधिकारांना करिअर कट्टा तालुका समन्वयक प्रा. अशोक मोरे यांनी शपथ दिली.

करिअर कट्टा या शासनाच्या योजनेमार्फत प्रत्येक महाविद्यालयात प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांना ३६५ रूपये भरून तीन वर्ष ऑनलाईन स्पर्धापरीक्षांसंदर्भात दररोज सायंकाळी मार्गदर्शन केले जाते. यामध्ये आयएएस आपल्या भेटीला, उद्योजक आपल्या भेटीला, स्पर्धापरीक्षांचे स्वरूप, पोलीस भरतीसंबंधी मार्गदर्शन असे विविध उपक्रम राबविले जातात.

आपल्या महाविद्यालयातदेखील करिअर कट्टाची स्थापना यापूर्वी करण्यात आल्याचे प्राचार्य हर्शल जोशी यांनी सांगितले, तसेच महाविद्यालयात प्रथम वर्षाच्या एकूण ५० विद्यार्थ्यांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी आपली नोंदणी करण्याचे करिअर कट्टाचे समन्वयक डॉ. नितीन मुटकुले यांनी सांगितले. या वेळी प्रा.जगदीश शिगवण, प्रा. नितीन मुटकुले, प्रा.भारत पवार, प्रा.निकिता मांडवकर, अमित बाकाडे, दिलिप ढेपे, संजय गायकवाड व इतर शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचलन निर्जला नाडकारणे, सलोनी अधिकारी यांनी केले, तर उपस्थितांचे आभार प्रा.अशोक मोरे यांनी मानले.



# रोठ बुद्रुक शाळेत छत्री, खाऊवाटप



**धाटाव : प्रतिनिधी**

राज्याचे उपमुख्यमंत्री तथा भाजपचे धुरंदर नेतृत्व देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त रोठ बुद्रुक शाळेत विद्यार्थ्यांना छत्री व खाऊवाटप करण्यात आले. भाजप रोहा तालुकाध्यक्ष अमित घाग यांच्या माध्यमातून हे वाटप झाले. या वेळी जिल्हा चिटणीस श्रद्धा घाग, रोड बुद्रुक ग्रामपंचायत सदस्य वैभवी भगत, भाजप रोठ खुर्द बुथ प्रमुख सचिन मोरे, राजेश भगत, बेबी घाग, रितेश घाग, अर्चना पाटील, सुबोध पाटील, करण सोनुने, मुख्याध्यापक पुजा जाधव, उपशिक्षिका निर्मला नाक्ती यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.

## शैक्षणिक साहित्य आणि रोपवाटप

**धाटाव** : रोहा तालुक्यातील सामाजिक बांधिलकी क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या राजमुद्रा फाउंडेशनच्या वर्धापन दिनानिमित्त रोठ बुद्रुक राजिप शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले तसेच डॉ. सी.डी. देशमुख माध्यमिक विद्यालय येथे फाउंडेशनचे संस्थापक अमित घाग यांच्या माध्यमातून विविध उपयुक्त रोपे लागवडीसाठी सुपूर्द करण्यात आली. या वेळी फाउंडेशनचे कार्याध्यक्ष राजेश भगत, संघटिक श्रद्धा घाग, रोठ बुद्रुक ग्रामपंचायत सदस्य वैभवी भगत, रितेश घाग, जितेंद्र जाधव, सुबोध पाटील, अर्चना पाटील, रोहित यादव, नरेश कोकरे, रंजना कोकरे, हरिभाऊ घाग, प्रतीक्षा घाग, करण सोनुने, ओमकार घाग आदी उपस्थित होते.

# पळसदरीच्या स्वामी समर्थ मठात गुरूपौर्णिमा साजरी

**कर्जत : प्रतिनिधी**

पळसदरी येथील अक्कलकोट निवासी श्री स्वामी समर्थ मठात गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी करण्यात आली. गुरुपौर्णिमेनिमित्त विविध क्षेत्रात विशेष कार्य करणाऱ्या मान्यवरांचा विशेष सन्मान करण्यात आला. स्वामींच्या पादुकांवर अभिषेक, गुरूपाद्य पुजन, दत्त याग तसेच दुपारी आरती, गुरुपौर्णिमा अन्नदान ग्रुपच्या वतिने महाप्रसाद व स्वरांजली हा दृष्टीबाधीतांचा भावभक्तीगीतांचा कार्यक्रम साजरा झाला. सायंकाळी श्रीराम समर्थ महिला मंडळाची हरिपाठ सेवा तसेच रात्रीच्या आरतीनंतर तेजसबुवा महाडीक संचालित सप्तसूर एक स्वरांगिनी ही भजनसेवा, महाप्रसाद आदी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



पळसदरी पंचक्रोशीतील चार्टर्ड अकाउंटंट होण्याचा मान मिळवलेल्या सिद्धी संजय शिंदे, पत्रकार अभिजीत दरेकर, प्रभाकर गंगावणे, प्रशांत खराडे यांचा विशेष सन्मान करण्यात आला. दिनेश अडावदकर यांनी सूत्रसंचालन केले. या वेळी विक्रांत दरेकर, राजू पोतदार, ॲड. प्रदीप सुर्वे, ज्ञानेश्वर दुधे, रघुनाथ निगुडकर आदी उपस्थित होते.

# निसर्ग, वन्यजीव संवर्धक राजू मुंबईकर

दिलखुलास व्यक्तिमत्व राजेंद्र बळीराम मुंबईकर म्हणजेच राजू मुंबईकर यांचा आज वाढदिवस. त्यांचा जन्म उरण तालुक्यातील वेश्वी या गावात काबाडकष्ट करणाऱ्या सुसंस्कारी शेतकरी कुटुंबात झाला. त्यांच्या आईचे नाव ठकूबाई आणि वडिलांचे नाव बळीराम मुंबईकर. चार भाऊ, एक बहीण अशा मायाळू सामान्य कुटुंबात जन्मलेल्या या युवकाने पुढे जाऊन असामान्य कार्य करत आपल्यासोबतच आपल्या कुटुंबाचे नाव मोठे केले आहे.



राजू मुंबईकर यांच्या नावातच राजयोग आहे. त्यांनी आपल्या आयुष्यातील जीवनप्रवासात सामाजिक बांधिलकी जपत अनेक समाजोपयोगी कार्य केली आहेत आणि यापुढेही होणार आहेत. तेव्हा अशा कर्मयोगी व्यक्तिमत्वाचा सर्वांना परिचय व्हावा, त्याचबरोबर त्यांच्या या अनमोल कार्यातून समाजात सर्वांनी स्फूर्ती आणि प्रेरणा घ्यावी हाच उद्देश डोळ्यांसमोर ठेवून राजू मुंबईकर यांचा संक्षिप्त परिचय...

राजू मुंबईकर यांनी २००९ साली आपल्या जिवाभावाच्या सर्पमित्र सहकारी मित्रांच्या मदतीने भूतदया परमो धर्मा: हे उद्दिष्ट मनाशी बाळगून केअर ऑफ नेचर सामाजिक संस्था वेश्वी या नावाची प्राणीमित्र सामाजिक संस्था स्थापन करून उरण, पनवेल, मुंबई, नवी मुंबईसारख्या शहरातदेखील आपल्या संस्थेच्या २५ शाखा कार्यरत करून आपल्या २६८ सर्पमित्र, वन्यजीवप्रेमी सभासद सहकाऱ्यांच्या प्रामाणिक प्रयत्नातून अनेक वन्यजीवांना आणि आठ हजारांच्या वर सापांना जीवदान दिलंय. अनेक वेळा जखमी अवस्थेत असलेल्या प्राणी, पक्षी, वन्यजीवांवर औषध-उपचार करून त्यांना पुन्हा निसर्गाच्या सानिध्यात मुक्त संचार करण्याकरिता मुक्त केलंय. वेळप्रसंगी आपल्या जीवावर उदार होत सन २०१०मध्ये करंजा गावात धुमाकूळ घातलेल्या बिबट्याला पकडण्यासाठी वनविभागाचे अधिकारी आणि कर्मचारी यांच्या खांद्याला खांदा लावत सलग १८ तास अथक परिश्रम घेत त्या बिबट्याला पकडण्यात यश मिळवलं. या कार्याबद्दल वनविभागाने त्यांच्या कार्याची दखल घेत अलिबाग येथे त्यांचा यथोचित गौरव करून सन्मानित केलं. म्हणूनच खऱ्या अर्थाने ते प्राणीमित्र म्हणून संपूर्ण विभागात सुपरिचित झाले. सोबतच मुक्या प्राण्यांवर प्रेम-दया करत आपलं दायित्व जपणाऱ्या संस्थेचे संस्थापक म्हणून संपूर्ण परिसरात नावारूपाला आले.

राजू मुंबईकर आपल्या प्रबोधनात्मक कार्यक्रमाद्वारे पर्यावरणाचा समतोल, साप समज आणि गैरसमज या व्याख्यानरूपी कार्यक्रमातून समाजप्रबोधनाचं कार्य करत आजपर्यंत तब्बल १५००च्या वर व्याख्यानपुष्प सादर केली आहेत तेही कुणाकडून कुठल्याही प्रकारचा मोबदला न घेता अगदी विनामूल्य, शिवाय स्वतःच्या खर्चाने तिथंपर्यंतचा प्रवास करत. मुंबईतील नामांकित कॉलेजच्या विद्यार्थ्यांना प्राणी, पक्षी आणि सापांबद्दल समाजात असणारे गैरसमज आणि अंधश्रद्धा याबद्दलची उपयुक्त आणि महत्त्वाची माहिती देत उपस्थित विद्यार्थीवर्ग आणि प्रशिक्षणार्थी अधिकारी आणि कर्मचारीवर्गाला आपल्या व्याख्यानरुपी प्रबोधनाद्वारे मंत्रमुग्ध करणारे राजू मुंबईकर यांनी एक धाव निसर्गासाठी, स्त्री-भ्रूणहत्या, प्लास्टिक निर्मूलन अभियान, जिल्हास्तरीय आदिवासी मेळावा, मॅरेथॉनच्या आयोजनाबरोबरच शेकडो गरीब गरजूवंत रुग्णांकरिता रुग्णवाहिकेच्या माध्यमातून सोबतच रस्त्यावर होणाऱ्या अपघातात अपघातग्रस्त रुग्णांना उपचाराकरिता वेळप्रसंगी स्वतःच्या गाडीत घालून दवाखान्यात दाखल करून अनेकांचे प्राण वाचविण्याचं आदर्शवत कार्य केलं आहे. म्हणूनच त्यांना कर्नाळा पक्षी अभयारण्य क्षेत्रातील अतिसंवेदनशील वन्यजीव अधिवास निर्मितीबाबत वार्षिक कृतीआराखड्यानुसार सामाजिक वैधानिक पदावर नियुक्त केलं आहे. सोबतच नेरे शांतीवन येथील कुष्ठरोग निवारण समितीच्या स्वावलंबी बांधवांना आणि करुणेश्वर वृद्धाश्रमातील त्या जीवाभावाच्या नात्यांच्या माणसांपासून दूर असणाऱ्या वृद्ध माय-बापांना सदैव मायेचा हात पुढे करत त्यांच्याकरिता थंडीच्या काळात चादर ब्लँकेट्सचं वाटप, तर या कोरोना महामारीच्या काळात त्यांच आरोग्य सुरक्षित राहावं म्हणून सॅनिटायजर आणि मास्कचं वाटप तसेच वृद्ध माय-बापांकरिता बिस्किटं, मिठाई, खाऊचे वाटप करत दिवाळी पहाटसारख्या कार्यक्रमातुन सुमधुर गीतसंगीताचा नजराणा पेश करत त्यांच्या जीवनात आनंदाचा पाझर फुलविणारा त्यांचा मायाळू लेक म्हणून त्या माय- बापांच्या मनाच्या एका कप्प्यात कायम आपलं नाव बंदिस्त करून ठेवलंय! म्हणूनच खऱ्या अर्थाने राजू मुंबईकर आपल्या कार्याने जनसामान्याच्यां मनात आपलं घर करून बसले आहेत.

अशा अनेक समाजपयोगी कार्यांचा आलेख पाहता त्याची दखल घेत समाजात राजू मुंबईकर यांना आजपर्यंत ६३ पुरस्कार मिळाले आहेत. त्यात महाराष्ट्राचे भूषण, रायगड भूषण, कर्नाळा रत्न, आगरी समाज भूषण, साई सन्मान, आदिवासी मित्र, रायगड रत्न, निसर्गमित्र, शूर वीर पुरस्कार, महाराष्ट्र शासनाचा वन्यजीव संरक्षक पुरस्कार, महाराष्ट्र राज्याचे मंत्री यांच्या हस्ते कोरोना १९ योद्धा, मिमिक्री आर्टिस्ट असोसिएशन मुंबई व मराठी वाद्यवृंद संघ मुंबई यांच्या वतीने कोविड योद्धा १९, सोबती संस्था पेण व बापूसाहेब नेने फाऊंडेशन यांच्या वतीने गुणवंत पुरस्कार, सोबतच पुण्यात रोटरी आंतरराष्ट्रीय पारितोषिक वितरण सोहळ्यात सर्वात कमी वयात एकाच वेळी चार पुरस्कार प्राप्त केले.

गेल्या अनेक वर्षापासून समाजसेवेचे निस्वार्थी व्रत हाती घेतलेल्या या जनमान्य समाजसेवकानं आपल्या जीवनात स्वार्थ पहिला नाही. सोबतच त्यांच्या खांद्याला खांदा लावून त्यांच्या प्रत्येक कार्यात सहभागी होणारी त्यांची सहचरणी म्हणजेच राणीताई मुंबईकर पै पाहुण्यांनाचा आदर पाहुणचार कसा करावा हे त्यांच्याकडून शिकावं असं. सर्व मित्र परिवाराचे, सहकारीवर्गाचे बंधूतुल्य मित्र, गोरगरीब जनसामान्यांचे आधारवड सन्माननीय राजू मुंबईकर यांचा सर्वांना सार्थ अभिमान आहे. आपण यापुढेही समाजात आपल्या कर्तृत्वानं यशाची एक एक शिखरं पादाक्रांत करत खूप पुढे जात रहा आणि सोबतच आपल्या समाजभिमुख कार्याची उंची अशीच उत्तरोत्तर वाढत जाओ हीच ईश्वरचरणी प्रार्थना आणि मनोकामना!

**-अनिल घरत, पिरकोन, उरण**

# टी-२० क्रमवारीत भारताच्या लेकींची झेप

**दुबई : वृत्तसंस्था**

सध्या श्रीलंकेत महिला टी-२० आशिया चषक खेळला जात आहे. भारतीय संघाने आपले सलग दोन सामने जिंकून उपांत्य फेरीच्या दिशेने वाटचाल कायम ठेवली असताना, आयसीसी आंतरराष्ट्रीय क्रमवारीत भारतीय महिला संघाची कर्णधार हरमनप्रीत कौर आणि शेफाली वर्मा यांनी मोठी झेप घेतली आहे.

श्रीलंकेत सुरू असलेल्या आशिया कप स्पर्धेमुळे टी-२० क्रमवारीत मोठे बदल दिसून आले आहेत. भारताने आतापर्यंत पाकिस्तान आणि यूएईवर मोठे विजय नोंदवले आहेत. कर्णधार हरमनप्रीत आणि सलामीवीर शेफाली टी-२० फलंदाजी क्रमवारीत अव्वल १०मध्ये स्थान मिळवण्याच्या जवळ पोहचल्या आहेत. दोघीही आता संयुक्तपणे ११व्या क्रमांकावर आहेत.

शेफाली वर्माने पाकिस्तानविरुद्धच्या ४० धावांच्या खेळीनंतर चार स्थानांनी झेप घेतली आहे. यूएईविरुद्धच्या ६६ धावांच्या खेळीचा फायदा हरमनप्रीत कौरला झाला आहे. रिचा घोषनेही युएईविरुद्ध २९ चेंडूत ६४ धावांची नाबाद खेळी खेळली. यानंतर ती २८व्या स्थानावरून २४व्या स्थानावर पोहचली आहे.

गोलंदाजांबद्दल बोलायचे झाले तर भारतीय वेगवान गोलंदाज रेणुका सिंगने पाकिस्तानविरुद्ध १४ धावांत दोन विकेट घेतल्या. यानंतर ती १०व्या स्थानावरून नवव्या स्थानावर आली आहे. म्हणजेच तिला एका स्थानाचा फायदा झाला आहे. दीप्ती शर्माने टी-२०मधील अष्टपैलू आणि गोलंदाजी क्रमवारीत तिसरे स्थान कायम राखले आहे, तर स्मृती मानधनाही पाकिस्तानविरुद्ध शानदार ४५ धावा करून पाचव्या स्थानावर कायम आहे.



# भारताविरुद्धच्या टी-२० मालिकेसाठी असलंका करणार श्रीलंकेचे नेतृत्व



**कोलंबो : वृत्तसंस्था**

भारत आणि श्रीलंका यांच्यात तीन सामन्यांची टी-२० मालिका खेळवण्यात येणार आहे. या मालिकेसाठी भारतीय संघ श्रीलंकेत पोहचला आहे. टी-२० मालिकेतील पहिला सामना २७ जुलै रोजी होणार आहे. त्याआधी श्रीलंका क्रिकेट बोर्डाने संघाची घोषणा केली आहे. इतकंच नाही तर वानिंदू हसरंगाने कर्णधारपद सोडल्यानंतर या मालिकेसाठी नवा कर्णधार कोण असेल हेही जाहीर केले आहे.

टी-२० मालिकेसाठी चरिथ असलंकाला श्रीलंकेचा नवा कर्णधार बनवण्यात आले आहे. माजी कर्णधार दासून शनाका आणि वानिंदू हसरंगा यांचाही संघात समावेश करण्यात आला आहे. बोर्डाने संघात फारसे बदल केलेले नाहीत, मात्र अनुभवी आणि युवा खेळाडूंना संधी देण्याचा प्रयत्न नक्कीच आहे. संघाचा माजी कर्णधार आणि अफाट अनुभव असलेला खेळाडू अँजेलो मॅथ्यूजला स्थान देण्यात आलेले नाही. यामागचे कारण काय हे स्पष्ट झालेले नाही.

चरिथ असलंका २०२४ च्या टी२० विश्वचषकात संघाचा उपकर्णधार होता. वानिंदू हसरंगाने कर्णधारपदावरून पायउतार होण्याचा निर्णय जाहीर केल्यानंतर तो संघाचा नवा कर्णधार होऊ शकतो, अशी चर्चा होती. आता श्रीलंका क्रिकेट बोर्डाने त्याची अधिकृत घोषणा केली आहे.




# रायगडचे रमेश खरे यांना राष्ट्रीय पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत सुवर्णपदक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

इंदौर येथे राष्ट्रीय मास्टर्स पॉवरलिफ्टिंग इक्विपड आणि अनईक्विपड स्पर्धा नुकतीच झाली. या स्पर्धेत महाराष्ट्र राज्य पॉवरलिफ्टिंग संघातून मास्टर्स पुरुष (७० वर्षावरील) गटासाठी रायगड जिल्ह्याचे पेणच्या हनुमान व्यायामशाळेतील रमेश उर्फ आप्पा खरे यांची निवड ६६ किलो वजनी गटासाठी झाली होती. ज्येष्ठ पॉवरलिफ्टिंग खेळाडू रमेश खरे (वय ७५ पूर्ण) यांनी एकूण २०५ किलो वजन उचलून सुवर्णपदक पटकाविले आहे.

स्कॉट या प्रकारात ६६ किलो, बेंच प्रेस प्रकारात ५५ किलो आणि डेडली प्रकारात ९० किलो असे एकूण २०५ किलो वजन खरे यांनी उचलले. त्याबद्दल त्यांना गटातून पहिले आणि इतर प्रकारातील ही पहिले अशी एकूण चार सुवर्णपदक प्राप्त झाली आहेत. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या हेड मेकॅनिक या पदावरून सेवानिवृत्त झालेले रमेश खरे हे हनुमान जिमचे संचालक, राष्ट्रीय पॉवरलिफ्टिंग पदक विजेते दाम्पत्य राजेश अंनगत आणि मयुरा अंनगत यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करीत आहेत तसेच शरीरसौष्ठव पंच असून रायगड संघटनेवर कार्यरत आहेत.

रमेश खरे यांनी मिळवलेल्या या सुवर्णपदकाबद्दल पॉवरलिफ्टिंग स्पोर्ट्स असोसिएशन रायगडचे अध्यक्ष गिरीश वेदक, सहसचिव सचिन भालेराव, खजिनदार राहुल गजरमल, सदस्य संदीप पाटकर, सुभाष टेंबे, कार्याध्यक्ष यशवंत मोकल, माधव पंडित आणि सचिव अरुण पाटकर यांनी आनंद व्यक्त केला आहे. खरे यांनी या वयात सुवर्णपदक प्राप्त करून एक प्रेरणादायी आदर्श आजच्या रायगड जिल्ह्यातील तरुण पिढीला दिला आहे, असे गौरवोद्गार महाराष्ट्र राज्य पॉवरलिफ्टिंग असोसिएशनचे सचिव संजय सरदेसाई यांनी काढले.

# स्वत:च्या कामगिरीवर समाधानी -श्रीजेश

**नवी दिल्ली** : 'ऑलिम्पिकनंतर निवृत्त होण्याचा निर्णय घेताना मागे वळून बघतो तेव्हा मला स्वत:चाच खूप अभिमान वाटत आहे. हा प्रवास काही विलक्षण नव्हता. माझे कुटुंब, सहकारी, प्रशिक्षक, चाहते आणि हॉकी इंडिया अशा प्रत्येकाकडून मिळालेल्या प्रेम आणि प्रोत्साहनाच्या बळावरच मी इथपर्यंत येऊ शकलो. या प्रत्येकाचा मी सदैव ऋणी राहीन,' असे भारताचा अनुभवी हॉकी गोलरक्षक पी.आर. श्रीजेशने म्हटले आहे. श्रीजेशने १८ वर्षांच्या प्रदीर्घ कारकीर्दीला पॅरिस ऑलिम्पिकनंतर पूर्णविराम देण्याचा निर्णय सोमवारी जाहीर केला. तो चौथ्यांदा ऑलिम्पिक स्पर्धेत खेळत असून अनेक राष्ट्रकुल आणि विश्वचषक स्पर्धेसह तब्बल ३२८ आंतरराष्ट्रीय सामन्यांचा अनुभव श्रीजेशच्या गाठीशी आहे.

# एसओएस बालग्राममध्ये बुद्धीबळ प्रशिक्षण

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग सोगाव येथील एसओएस बालग्राम गुरूपौर्णिमेचे औचित्य साधून बुद्धीबळ प्रशिक्षण वर्ग सुरू करण्यात आला.

सद्गुरूवाचोनी सापडेल सोय या कविवर्य विंदा करंदीकर यांच्या कवितेचा मथितार्थ प्रमुख पाहुणे प्रा. शाम जोगळेकर यांनी सर्वांसमोर सोदाहरण मांडला.




आपल्यातल्या दडलेल्या हिऱ्याचा शोध घ्यावा, असे सर्वांना आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले. रायगड जिल्हा बुद्धीबळ संघटनेचे अध्यक्ष विलास म्हात्रे आणि सुशील गुरव यांनी बुद्धीबळ खेळाचे महत्व सांगितले.

जागतिक बुद्धीबळ संघटनेला २० जुलै २०२४ रोजी शंभर वर्षे झाली. त्यानिमित्ताने बालग्राममधील सर्वांसाठी या मोफत प्रशिक्षणवर्गाचा प्रारंभ झाला. दिलीप पाटील आणि काही विद्यार्थ्यांनी गुरूपौर्णिमेचे महत्त्व मांडले. ग्रामप्रमुख सुजय बाजपाई यांनी सर्वांचे स्वागत केले.

जीवेत् शरदः शतम्!
**मनोज माळी**
यांना वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा



शुभेच्छुक
प्रकाश पाटील

# कबड्डी लीगमध्ये जुन्नर, पुणे संघ विजेते

**पुणे : प्रतिनिधी**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या वाढदिवसानिमित्त बाणेर येथील बाबुराव चांदेरे सोशल फाउंडेशन व पुणे जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या यांच्या संयुक्त विद्यमाने श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल, म्हाळुंगे-बालेवाडी येथे पुणे लीग सतेज करंडक स्पर्धा रंगली. या स्पर्धेत पुरुषांमध्ये शिवनेरी जुन्नर आणि महिलांमध्ये वेगवान पुणे या संघाने विजेतेपद पटकाविले. शनिवारी (ता. २०) झाली. या स्पर्धेचे पारितोषिक वितरण पार्थ पवार यांच्या हस्ते करण्यात आले.

पुरुषांच्या अतिम सामन्यात शिवनेरी जुन्नर संघाने माय मुळशी संघावर ४७-४३ विजय असा मिळविला. मध्यंतराला शिवनेरी जुन्नर संघाकडे २४-१५ अशी आघाडी होती. जुन्नर संघाच्या प्रणव बांगर याने चढाईत २० गुण, शुभम बिटके याने नऊ व प्रवीण बाबर याने चार गुण मिळवले, तर स्वप्नील कोळी याने तीन पकडी घेतल्या. मायमुळशीच्या राहुल वाघमारे याने ११ गुणांसह दोन बोनस गुण, तर आदित्य गोरे आणि अजित राठोड यांनी प्रत्येकी नऊ गुणांसह दोन बोनस गुण मिळविले.

महिलांच्या अंतिम सामन्यात वेगवान पुणे संघाने शिवनेरी जुन्नर संघावर दणदणीत विजय मिळवित सतेज करंडक पटकाविला. मध्यंतराला वेगवान पुणे संघाकडे १८-९ अशी आघाडी होती. वेगवान पुणे संघाने संपूर्ण सामन्यात चार बोनस गुण मिळविले, तर दोन गुण लोणचे व एक गुण तांत्रिक गुण मिळविला. शिवनेरी संघाने सहा बोनस गुण मिळविले. वेगवान पुणे संघाच्या प्रज्ञा कासार हिने चौफेर चढाया करीत १२ गुण मिळविले व आपल्या संघाला भक्कम आघाडी मिळवून दिली. साक्षी गावडे हिने तीन व निकिता खाडे हिने दोन चांगल्या पकडी केल्या. जुन्नर संघाच्या रिया धुमाळ हिने १० गुण मिळवून जोरदार प्रतिकार केला. सिफा वस्ताद हिने तीन पकडी घेतल्या.

# प्रशांत सुर्वे बंगाल वॉरियर्स संघाच्या प्रशिक्षकपदी



**पाली : प्रतिनिधी**

संगमेश्वर साडवली सह्याद्रीनगर येथील रहिवासी प्रशांत सुर्वे यांची बंगाल वॉरियर्स कबड्डी संघाच्या प्रमुख प्रशिक्षकदी निवड झाली आहे. सुर्वे यांनी कबड्डीच्या माध्यमातून साडवलीसह संगमेश्वर तालुका व रत्नागिरी जिल्ह्याचे नाव रोशन केले आहे.

प्रशांत सुर्वे यांनी सह्याद्रीनगर साडवली कबड्डी संघातून खेळाला प्रारंभ केला. महाविद्यालयीन जीवनात मुंबई युनिव्हर्सिटी संघाचे कर्णधारपद भूषविले. युनियन बँक स्पोर्ट्स बोर्डमधून सात वर्षे राष्ट्रीय स्पर्धांमध्ये सहभाग घेतला. युनियन बँक, रत्नागिरी जिल्हा संघाचे व महाराष्ट्र संघाचे कोच म्हणूनही कामगिरी बजावली आहे. बंगाल वॉरियर्स संघाचे असिस्टंट कोच म्हणून गतवर्षी उत्कृष्ट काम केले. याची दखल घेत त्यांची ऑक्टोबर महिन्यात होणाऱ्या प्रो कबड्डी स्पर्धेसाठी प्रमुख प्रशिक्षकपदी निवड झाली आहे. त्यांचे अभिनंदन होतेय.

द्वितीय पुण्यस्मरण सोहळा



स्व. धर्मा सुदाम पाटील
(दि. २५/०७/२०२४)

आमचे वडील स्व. धर्मा सुदाम पाटील यांचा द्वितीय पुण्यस्मरण सोहळा आपणा सर्वांच्या सहकार्याने साजरा होत आहे. त्या निमित्त भजन व हरी किर्तन असा परमार्थिक सोहळा करण्याचे योजिले आहे. तरी आपण सदर कार्यक्रमास उपस्थित रहावे, ही नम्र विनंती.

कार्यक्रम



सकाळी: 9 ते 10 वा. प्रतिमा पूजन
सकाळी: 10 ते 12 वा. किर्तन

किर्तनकार -ह.भ.प. निलेश महाराज कोरडे
गायक - रमेश महाराज तांबडे
पखवाज - एकनाथ बुवा भाग्यवंत
किर्तन साथ -पंचक्रोशीतील सर्व वारकरी मंडळी मुर्वी, खारघर, कोपरा, बेलपाडा, रांजणपाडा, पेठ, ओवे, ओवे कॅम्प, खुटूकबांधण, पापडीचा पाडा, तळोजे, मजकूर, पेंधर

चक्रीभजन - सायं. ६ ते ८ वा. पर्यंत
अशोकबुवा पाटील, पखवाज - सोनू पाटील
विश्वनाथबुवा ठाकूर, पखवाज -गोरख पाटील
जनार्दनबुवा पाटील, पखवाज -रोहिदास पाटील
मिलिंदबुवा करावकर, पखवाज -जगदिश करावकर
कैलासबुवा पाटील, पखवाज -चेतन पाटील

महाप्रसाद: दुपारी १२.३० ते रात्री १० वा. पर्यंत

आपले नम्र
श्री. अभिमन्यु धर्मा पाटील (मा. सभापती, नगरसेवक प.म.पा.)
कु. संजय धर्मा पाटील,
कु. नितेश अभिमन्यु पाटील (अध्यक्ष : भा.ज.पा. युवा मोर्चा खारघर मंडळ)
समस्त पाटील परिवार व ग्रामस्थ मंडळ, मुर्बी

घरचा पत्ता : घर क्र. ८६३, मु. मुर्बी, सेक्टर १९, पो. खारघर, ता. पनवेल, जि. रायगड

CON Care of Nature
रजि. नं. : महा.एफ ८८८७

सस्नेह निमंत्रण



केअर ऑफ नेचर सामाजिक संस्था महाराष्ट्र राज्य आयोजित
केअर ऑफ नेचर सामाजिक संस्था महाराष्ट्र राज्याचे संस्थापक, महाराष्ट्र भूषण
मा. श्री. राजु मुंबईकर
यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून दि. २३, २४ व २५ जुलै २०२४ रोजी सकाळी १०.०० वा. पासून कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

- आम्ही दुरशेतकर गावाच्या नामफलकाचे आनावरण
- आम्ही गोवठणेकर गावाच्या नामफलकाचे आनावरण
- आम्ही गावठाणकर या बोधचिन्हाचे ओपनीग
- सारसई येथील ५ वाडयांना एक बसस्टॉप ओपनींग
- रा.जि.प. शाळा खरोशी-पेण टी. व्ही. संच वाटप
- रा.जि.प. शाळा वेश्वी येथे शैक्षणिक साहित्य वाटप
- रा.जि.प. शाळा वेश्वी कातकरवाडी येथे शैक्षणिक साहित्य वाटप
- मित्र परिवार सारडे गोल्डंजुबली मित्र मंडळ पूर्व विभागसाठी गवत कापायची मशीन वाटप
- केअर ऑफ नेचर समाजिक संस्था महाराष्ट्र वेश्वी रॉक अनिमल पार्क येथे सी.सी.टी.व्ही.कॅमेरा ओपनिंग
- केअर ऑफ नेचर समाजिक संस्था महाराष्ट्र वेश्वी रॉक अनिमल पार्क येथे प्राण्यांच्या पुतळ्याचे अनावर
- केअर ऑफ नेचर समाजिक संस्था महाराष्ट्र वेश्वी रॉक अनिमल पार्क येथे वृक्षारोपण कार्यक्रम
- २५ जुलै रोजी सायं. ४.३० वा. - मंगळागौर व पारंपारीक फेर नृत्य स्पर्धा
- सारडे येथील गोल्डन ज्युबली मित्र मंडळ कोमनादेवी डोंगरावर पक्षांच्या पुतळ्याचे अनावर व वृक्षारोपण कार्यक्रम
- मोठी जुई येथील बंदरावर कोळी बांधवाना बसायला बैठक बेंचे ओपनिंग
- पाले येथील एक अपंग मुलीला दरवर्षी औषध उपचारासाठी अर्थिक स्वरुपात मदत देणार.
- इर्शाल वाडी येथील गेल्यावर्षी अनेक आदिवासी बांधव दरड पडून मृत्यू झाले होते आणि बेघर झाले होते काही वाचले होते त्या बांधवाना अन्नधान्य वाटप कार्यक्रम.
- आदिवासी आश्रम शाळा चिरनेर येथील मुलांना शैक्षणिक साहित्य वाटप.
- वेश्वी कातकरवाडी, खैरकाठीवाडी, भुऱ्याची वाडी, मार्गाचीवाडी, खोंडयाची वाडी, बंगलावाडी, सागवाडी, निफाडवाडी, माडभुवनवाडी, चिरनेर अक्कादेवीवाडी, पुनाडेवाडी, सोनारवाडी, टोकाचीवाडी धनगरवाडी, बागेचीवाडी, आपटेवाडी येथे सर्व आदिवासी कुटुंबाना घरगुती सामान वाटप.
- करुनेश्वर आश्रम भानघर येथे आजी आजोबांना कपडे वाटप, करमणूक कार्यक्रम व अन्नदान.
- श्री नाकोडा मुक बधिर विद्यालय सरवली भिवंडी येथील मुलांना गोड जेवण.
- चिरनेर येथे आदिवासी शाळेतिल मुलांना भोजन.
- खरोशी येथे ज्येष्ठ नागरिकाना बसण्यासाठी निवारा शेड बसविण्यात येणार आहे.

दि. २४ जुलै २०२४ रोजी - राजू मुंबईकर चषक पावसाळी रानसई प्रिमियर लीग

वाढदिवसानिमित्त दप्तर वाटप कार्यक्रम

- रा.जि.प. मराठी शाळा गावठाण
- रा.जि.प. शाळा गावठाण
- रा.जि.प. शाळा रानसई
- रा.जि.प. शाळा केल्याचा माळ
- रा.जि.प. शाळा आक्कादेवी चिरनेर
- रा.जि.प. शाळा दादारपाडा
- रा.जि.प. शाळा टाकिगाव
- रा.जि.प. शाळा बोरखार
- रा.जि.प. शाळा धाकटी जुई
- रा.जि.प. शाळा धुतुम
- रा.जि.प. शाळा पुनाडे वाडी
- रा.जि.प. शाळा कोप्रोली वाडी
- रा.जि.प. शाळा सारडे
- रा.जि.प. शाळा कल्हे
- रा.जि.प. शाळा रांजणपाडा
- रा.जि.प. शाळा विंधणे वाडी
- रा.जि.प. शाळा पाले
- शिवनसई अंगण वाडी
- रा जि प शाळा वुंदरे
- रा.जि.प.शाळा चिंचवली
- रिटघर अंगणवाडी येथे दप्तर वाटप
- रा.जि.प.शाळा रिटघर येथे शैक्षणिक साहित्य वाटप
- रिटघर हायस्कुल येथील आदिवासी मुलांना बॅग वाटप

आयोजक
केअर ऑफ नेचर सामाजिक संस्था, महाराष्ट्र राज्य
जे.एम. म्हात्रे चॅरीटेबल संस्था - पनवेल, डाबर इंडिया लिमिटेड, श्री साई देवस्थान साईनगर वहाळ, श्री समर्थ कृपा सखी स्वयंसहाय्यता संस्था - उरण, सुभाषशेठ भोपी सामाजिक संस्था - रिटघर, स्टेपआर्ट समाजिक संस्था - उरण.



अध्यक्ष
स्नेहल पालकर



उपाध्यक्ष
महेश पाटील